पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

# वार्षिक अहवाल २०१७-२०१८

---

महाविद्यालयाची सुरूवात दि. १५ जून २०१७ रोजी झाली. त्याच दिवशी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या सर्व नियोजनावर चर्चा केली. त्यानुसार सर्व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे ठरले.

## विद्यार्थी परिषद विभाग

१) **गुणवंतांचा सत्कार:-** प्रतिवर्षी प्रमाणे विद्यार्थी परिषदेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील बी. ए., बी. कॉम या विद्याशाखेतून व परिसरातील बारावी परीक्षेत प्रथम आलेल्या गुणवंतांचा सत्कार महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेच्या वतीने दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे मा. प्रा. यजुवेंद्र महाजन (संस्थापक, दीपस्तंभ फाऊंडेशन जळगावं) हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मा. श्री. शामसुंदरजी नाईक व प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे हे उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये एकूण ४७ विद्यार्थ्यांचा पुष्प व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला व त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

२) **वार्षिक स्नेहसंमेलन:-** प्रतिवर्षी प्रमाणे महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन विद्यार्थी परिषदेच्या वतीने करण्यात आले. स्नेहसंमेलन दि. २३ ते २५ जानेवारी २०१८ या दरम्यान संपन्न झाले. दि. २३ जानेवारी २०१८ रोजी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सहसंचालक उच्चशिक्षण जळगाव विभाग, मा. डॉ. केशव तुपे यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थानी डॉ. सर्जेराव ठोंबरे यांच्या अध्येक्षतेखाली पार पडले. उद्घाटनानंतर क्रीडा स्पर्धा, वकृत्व, वादविवाद, प्रश्नमंजूषा, पोस्टर स्पर्धा, रांगोळी इ. स्पर्धांचे विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात आयोजन करण्यात आले. दि. २५ जानेवारी २०१८ रोजी समारोप कार्यक्रमात स्पर्धेत प्रथम, द्वितीय स्थान प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख अतिथी डॉ. योगिता हाके पाटील व श्री रीव काथार यांच्या उपस्थितीत व प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.

३) **सावता भूषण पुरस्कार:-** महाविद्यालयाच्या वतीने प्रतिवर्ष दिला जाणारा सावता भूषण पुरस्कार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विद्यार्थी परिषद समिती मार्फत बी. ए., बी. कॉम. तृतीय वर्षातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मागवून त्यातून सर्व निकषात पात्र विद्यार्थ्यांची निवड करून हा पुरस्कार कु. प्रियंका शेषराव गायकवाड या बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थीनीस स्नेहसंमेलनातील समारोप कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

४) **विद्यार्थी परिषद गठन:-** शासन निर्णयानूसार दिनांक ३ ते १५ मार्च २०१७ या दरम्यान सर्व प्रक्रिया करून विद्यार्थी परिषदेच्या गठन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विद्यार्थी परिषदेचे सचिव म्हणून श्री लक्ष्मीकांत ढेपले यांची बिनविरोध निवड झाली.

# राष्ट्रीय सेवा योजना

**१) आव्हान - चान्सलर्स ब्रिगेड - आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर:-** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. ०१ जून ते १० जून २०१७ दरम्यान पार पडलेल्या आव्हान - चान्सलर्स ब्रिगेड - आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या समुहात महाविद्यालयाच्या सुर्यकांत दाभाडे या स्वयंसेवकाने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले व हे आव्हान शिबीर यशस्वीपणे पूर्ण केले. या शिबिरात महाराष्ट्राच्या प्रत्येक विद्यापीठाच्या प्रत्येक जिल्ह्याचे ३० रा. से. यो. स्वयंसेवक व एक कार्यक्रम अधिकारी असे सहभागी झाले होते. या वेळी औरंगाबाद जिल्ह्याच्या ३० स्वयंसेवकांच्या टीम सोबत टीम लीडर म्हणून रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन पंढरीनाथ माळेगावकर यांनी जबाबदारी पार पाडली.

**२) आंतरराष्ट्रीय योग दिन:-** दि. २१ जून २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे सकाळी ६.०० वा. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर एक दिवसीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे प्रामुख्याने उपस्थित होते. या शिबिराचा लाभ घेण्यासाठी महाविद्यालयाचे व परिसरातील विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक वर्ग व परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप, राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी परिश्रम घेतले.

**३) कृषि दिन:-** दि. १ जुलै २०१७ रोजी कृषी दिन व वनमहोत्सवाच्या निमित्ताने शासन आदेशानूसार महाविद्यालयाच्या परिसरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले व संत सावता गुरूकुल चे मुख्याध्यापक श्री अप्पासाहेब चव्हाण यांच्या हस्ते १० वृक्षांची लागवड केली गेली. या वेळी प्राचार्यांनी ७ जुलै २०१७ रोजी मौजे दरेगाव दरी येथे १०० रोपे महाविद्यालयाच्या रा. से. यो. च्या वतीने लावण्यात येतील असे मनोगत व्यक्त केले व हा कृषी दिन व वनमहोत्सव साजरा करण्यात आला.

**४) रामेश्वर वाघोळा येथे निम्बोळी पेरणी:-** संस्थेच्या वतीने दरवर्षी रामेश्वर वाघोळा येथील डोंगरावर निम्बोळी पेरणीचा कार्यक्रम घेण्यात येतो. याही वर्षी २ जुलै २०१७ रोजी या कार्यक्रमात रा. से. यो. च्या वतीने ५ स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर व सेवक श्री जयराम जाधव यांनी वाघोळा येथे जाऊन निम्बोळी पेरणी कार्यक्रमात सहभाग घेतला.

**५) वनमहोस्तवानिमित्त दरेगाव येथे वृक्षारोपन:-** दि. ७ जुलै २०१७ रोजी कृषी दिन व वनमहोस्तवानिमित्त दत्तक गाव दरेगाव दरी येथे रा. से. यो. च्या वतीने महाविद्यालयाच्या रोपवाटीके मध्येच तयार केलेली १०० रोपे दरेगाव दरी येथे नेऊन काही रोपे गावात लावली तर काही रोपे ही शेतकऱ्यांना वाटून त्यांना शेताच्या परिसरात त्याची लागवड करण्याचे सांगण्यात आले. या वेळी संस्थेचे सचिव श्री शामसुंदर नाईक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी मार्गदर्शन केले.

**६) रक्षाबंधन कार्यक्रम:-** फुलंब्री येथील आधार बालकाश्रम मध्ये दि. १२ ऑगस्ट २०१७ रोजी रा. से. यो. च्या वतीने रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ९८ उपस्थित विद्यार्थ्यांना मिठाई देऊन त्यांचे तोंड गोड करण्यात आले.

**७) स्वच्छता - शपथ:-** दि. १२ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सामाजिकशास्त्राचे अध्यिष्ठाता व प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या उपस्थितीत शासनाच्या आदेशानूसार स्वयंसेवक, विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग यांच्या कडून "मी घाण करणार नाही व करू देणार नाही, मी परिसर स्वच्छ राखण्याच्या प्रयत्न करेन" अशा आशयाची शपथ घेण्यात आली.

८) **स्वच्छता - श्रमदान:-** दि. १४ ऑगस्ट २०१७ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने पूर्वसंध्येला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी श्रमदान करून परिसर स्वच्छ केला.

९) **SRD/NRD संचलन पूर्व निवड चाचणीत सहभाग:-** दि. ०७ सप्टेंबर २०१७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात झालेल्या SRD/NRD संचालन पूर्व निवड चाचणीत महाविद्यालयाच्या रा. से. यो. च्या सहा स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

१०) **स्वच्छता - श्रमदान:-** दि. २३ सप्टेंबर २०१७ रोजी रा. से. यो. दिनाच्या निमित्ताने पूर्वसंध्येला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी श्रमदान करून परिसर स्वच्छ केला.

११) **रा. से. यो. दिन २४ सप्टेंबर २०१७:-** महाविद्यालयात दि. २४ सप्टेंबर २०१७ रोजी रा. से. यो. दिन साजरा करण्यात आला. यावेळी गट समन्वयक डॉ. डी. एफ. पाथ्रीकर, श्री सचिन ढाले यांनी रा. से. यो. चा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व आव्हान शिबीर पूर्ण केलेल्या काही स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना आव्हानाची लाईफ सेव्हिंग प्रात्यक्षिके करून दाखविली. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१२) **स्वच्छता - श्रमदान:-** दि. ६ ऑक्टोबर २०१७ रोजी रा. से. यो. वतिने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी श्रमदान करून परिसर स्वच्छ केला.

१३) **विभागीय कार्यक्रमाधिकारी कार्यशाळा:-** दि. ५ ऑक्टोबर २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पार पडलेल्या विभागीय कार्यक्रमाधिकारी कार्यशाळेस महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी सहभाग नोंदविला.

१४) **एड्स दिन:-** दि. १ डिसेंबर २०१७ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामीण रूग्णालयात फुलंब्री येथील कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयात एक पोस्टर प्रदर्शन लावले होते. यावेळी त्यांनी उपस्थित शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना एड्स या आजाराची माहिती, कारणे, उपाय, काळजी, लक्षणे, निरोधचा वापर या सर्व विषयावर माहिती देण्यात आली.

१५) **नेहरू युवा केंद्राची तालुका स्तरीय देश भक्ती व राष्ट्र निर्माण वकृत्व स्पर्धा:-** दि. १६ डिसेंबर २०१७ रोजी महाविद्यालयात तालुका स्तरीय वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. या तालुका स्तरीय स्वच्छता मित्र वकृत्व स्पर्धेत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत स्वयंसेविक मृणाली मनोरकर या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकाविला, तर लक्ष्मीकांत ढेपले या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकाविला.

१६) **स्वामी विवेकानंद जयंती:-** महाविद्यालयात रा. से. यो. च्या वतीने दिनांक १२ जानेवारी २०१८ रोजी स्वामी विवेकानंद जयंती युवा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१७) **नामविस्तार दिन:-** महाविद्यालयात रा. से. यो. च्या वतीने नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. विजय पांडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१८) **रा. से. यो. चे जिल्हा युवा नेतृत्व विकास शिबीर:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने दि. १६ ते २० जानेवारी २०१७ दरम्यान ५ दिवशीय जिल्हा युवा नेतृत्व शिबिराचे आयोजन विद्यापीठ परिसरातच करण्यात आले होते. यात महाविद्यालयाच्या २ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

१९) **पुणे येथे राज्यस्तरीय शिबिरात सहभाग:-** पुणे येथे दि. १८ जानेवारी २०१८ रोजी १ दिवशीय राज्यस्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात महाविद्यालयाच्या २ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

२०) **गोंदिया जिल्ह्यात केशोरी येथे राज्यस्तरीय शिबिरात सहभाग:-** गोंदिया जिल्ह्यातील केशोरी येथे दि. १ ते ८ फेब्रुवारी २०१७ रोजी ८ दिवशीय राज्यस्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात महाविद्यालयाच्या २ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

२१) **संत गाडगे महाराज जयंती २३ फेब्रुवारी २०१८:-** दि. २३ फेब्रुवारी २०१८ रोजी महाविद्यालयात संत गाडगे महाराज जयंती निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगे महाराज यांच्या स्मृतीचे पुजन करून त्यांना अभिवादन करून त्यांची जयंती साजरी करण्यात आली.

## आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग

**अ) महाविद्यालयलीन स्तरावरील उपक्रम:-**

१) **विद्यापीठ वर्धापन दिन व्याख्यान:-** दि. २३ ऑगस्ट २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून प्रा. राजू पोपळघट (समाजशास्त्र विभाग प्रमुख, राजर्षी शाहु महाविद्यालय, औरंगाबाद) यांनी "समाज व आजचे शिक्षण" या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या शिक्षणाने समाजमनात सकारात्क बदल आणि आत्मविश्वास निर्माण करावा, जेणे करून समाजपरिवर्तन घडवून येण्यात मदत होईल असे मत मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. शिक्षणाने माणूस स्वत: आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाला पाहिजे असे मत मांडले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. सपना सोळुंके या विद्यार्थीनीने केले. प्रास्तविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी तर आभार प्रा. विजय पांडे यांनी मानले.

२) **महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाधिकारी यांचा कार्यशाळेतील सहभाग:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील आजीवन शिक्षण व विस्ताव विभागाने दि. ७ सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित केलेल्या प्राचार्यांच्या बैठकीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित राहिले. तसेच दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी या विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत डॉ. पांडूरंग कल्याणकर हे उपस्थित होते.

३) **स्वयंसेवकांचा कार्यशाळेत सहभाग:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने दि. २६ सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित केलेल्या विद्यार्थी कार्यशाळेत महाविद्यालयाचा विद्यार्थी राजु जिजा खरात व कृष्णा कारभारी लहाने या दोन स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

४) **प्रजासत्ताक दिनी व्याख्यान:-** दि. २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आजीवन शिक्षण विभागाच्या वतीने "भारतीय राज्यघटना" या विषयावर डॉ. राजेंद्र नामदेवराव मोरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी ते म्हणाले की, आपण सार्वभौम म्हणजे परकीय सत्तेपासून मूक्त झाल्यानंतर आपण राज्यघटना स्वीकारली. आपण धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था स्वीकारली आहे. भारतीय राज्यघटनेतील तत्त्वांना डावलून राज्यकारभार केला जाणार नाही याची जबाबदारी आपण घेतली पाहिजे असे मत त्यांनी मांडले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले म्हणाले की, आज देशात विषमता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ३३ टक्के लोक अर्धपोटी झोपतात. तेव्हा उच्च शिक्षितांनी या संदर्भातील कारणांचा शोध घ्यावा. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. मंगल सुरभय्ये व सुमय्या सय्यद या स्वयंसेविकांनी केले. पाहुण्यांचा परिचय कु. मंगल सुरभय्ये या स्वंयसेविकेने तर आभार कु. ज्योती उदये या स्वयंसेविकेने मानले.

५) **महाआरोग्य शिबिरात सहकार्य:-** महाराष्ट्र राज्य विधानसभेचे अध्यक्ष मा. ना. हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिनांक १८ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालय परिसरात आयोजित

केलेल्या महाआरोग्य तपासणी शिबिरात स्वंयसेवकांनी नोंदणी विभाग, रूग्णांना व्यवस्थित तपासणी केंद्रापर्यंत पोहचवणे, कचरा उचलणे इत्यादी कामे करून शिबिरात सहकार्य केले.

**ब) समाजस्तरावरील उपक्रम:-**

१) **स्वातंत्र्यदिनी व्याख्यान:-** दि. १५ ऑगस्ट २०१७ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून राजर्षी शाहु महाविद्यालय, पार्थी येथील डॉ. युवराज गहिराव यांचे व्याख्यान लहुजी साळवे संस्कार केंद्रावर ठेवण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, स्वातंत्र्य संग्रामात समाजातील सर्वच घटकातील लोकांनी योगदान दिले. अनेकांच्या बलिदानातून देशाला स्वातंत्र्य मिळाले याची जाणीव आपण ठेवावी. यावेळी संस्कार केंद्रावरील बालकांनी राष्ट्रभक्तीपर गितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. ज्योती उदये नी मानले. प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले तर आभार प्रा. नितीन माळेगावकर यांनी मानले.

२) **आरोग्य तपासणी शिबीर:-** दि. ४ सप्टेंबर २०१७ रोजी आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने मौजे दरेगाव (दरी) ता. फुलंब्री येथे आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिरासाठी फुलंब्री येथील शासकीय रूग्णालयाचे अधिक्षक डॉ. संतोष देशपांडे यांनी वैद्यकीय सल्ला व औषधी पुरविली. या शिबिरात डॉ. विजय काथार यांनी उत्तम आरोग्यासाठी आहार, विहार व विचार चांगले असणे गरजेचे आहे तर पाटील यांनी रूग्णांची तपासणी केली. एकूण ६५ रूग्णांची तपासणी केली. यावेळी वृद्ध व महिला रूग्णांची मोठ्या प्रमाणावर तपासणी करून औषधी देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पांडुरंग यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. संजय पांचाळ, श्री रत्नाकर जाधव व स्वयंसेवक राजु खरात यांनी सहकार्य केले.

३) **विद्यापीठ नामविस्तार दिनी समाजस्तरावर व्याख्यान:-** दि. १४ जानेवारी २०१८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनाचे औचित्य साधून फुलंब्री गावातील लहुजी साळवे संस्कार केंद्रावर "बाबासाहेबांचे शिक्षण विषयक विचार" या विषयावर प्रा. पी. व्ही. ठाकरे यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते. त्यांनी बाबासाहेबांनी आपल्या जीवनात शिक्षणाला कसे प्राधान्य दिले हे सांगितले. तसेच समाजातील तळागाळातील लोकांचा विकास करण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शैक्षणिक संस्था उभारण्यावर भर दिला असे मत त्यांनी मांडले. यावेळी श्री रमेश तुपे या माजी विद्यार्थ्याने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. कु. मंगल सुरभैय्ये या विद्यार्थिनीने सुत्रसंचलन केले. प्रास्ताविक डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी तर आभार प्रा. नितीन माळेगावकर यांनी मानले. कार्यक्रमानंतर तिळगुळाचे वाटप करण्यात आले.

**क) स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम:-**

४) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे मंजूर केलेले स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमांपैकी सर्टिफिकेट कोर्स इन कम्यूनिकेटिव्ह इंग्लिश व विक्री प्रतिनिधी हे स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम चालविले. यातील कम्यूनिकेटिव्ह इंग्लिश, समन्वयक म्हणून डॉ. अश्विन रांजणीकर यांनी जबाबदारी सांभाळली तर विक्री प्रतिनिधी अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. महेश थोरात व प्रा. नितीन माळेगावकर यांनी काम केले. या अभ्यासक्रमाला अनुक्रमे १५ व १३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

## परीक्षा विभाग

**१) प्रथम सत्र परीक्षा:-** १० नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत बी. ए., बी. कॉम. व बी. एस्सी. च्या परीक्षा संपन्न झाल्या.

**२) प्रकल्प तपासणी:-** १ ते १२ मार्च या कालावधीत बी. ए. तृतीय वर्षाचा प्रकल्प तपासणी करण्यात आले.

**३) प्रात्यशिक:-** ३ ते १२ मार्च या कालावधीत बी. एस्सी. चे प्रात्यशिक घेण्यात येईल.

**४) द्वितीय सत्राच्या परीक्षा:-** १७ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत बी. ए., बी. कॉम. व बी. एस्सी. च्या द्वितीय सत्राच्या परीक्षा संपन्न होतील.

**५) निकाल - कला विभाग:-**

| | Oct-16 | | | Mar-17 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **BAFY** | **BASY** | **BATY** | **BAFY** | **BASY** | **BATY** |
| **ADMITED** | 106 | 68 | 67 | 106 | 68 | 67 |
| **EXAM APPEAR** | 84 | 58 | 61 | 76 | 57 | 63 |
| **PASSED** | 1 | 9 | 43 | 4 | 8 | 30 |
| **FAILED** | 76 | 46 | 17 | 67 | 39 | 33 |
| **ATKT** | 76 | 46 | 17 | 33 | 23 | 0 |
| **ABSENT** | 7 | 2 | 1 | 1 | 0 | 0 |
| **EHB** | 0 | 1 | 0 | 4 | 10 | 0 |
| **PASSING %** | **1.19** | **15.51** | **70.49** | **5.26** | **14.03** | **47.61** |
| **DISTINCTION** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 |
| **I class** | 0 | 0 | 4 | 1 | 3 | 20 |
| **II class** | 0 | 8 | 33 | 3 | 5 | 7 |
| **III class** | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |

**६) वाणिज्य विभाग:-**

| Examination | Year | Sem | Total Student | Exam Appear | Absent | Pass | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Oct/Nov 2016** | I | I | 68 | 53 | 01 | 10 | 18.86 |
| **Mar/April 2017** | I | II | 68 | 51 | 04 | 02 | 03.92 |
| **Oct/Nov 2016** | II | III | 64 | 53 | 00 | 10 | 18.86 |
| **Mar/April 2017** | II | IV | 64 | 49 | 01 | 09 | 18.36 |
| **Oct/Nov 2016** | III | V | 45 | 43 | 01 | 06 | 13.95 |
| **Mar/April 2017** | III | VI | 45 | 40 | 01 | 07 | 17.50 |

## प्रसिद्धी विभाग

महाविद्यालयात समाजपूरक, ज्ञानपूरक, तसेच शैक्षणिक विषयांना अनुसरून आयोजित केलेल्या उपक्रमांची माहिती समाजापर्यंत पोहंचावी, दृष्ठा समाज बनावा त्याचबरोबर समाजात चालू असलेल्या घडामोडींचे ज्ञान जनमानसाला व्हावे, समाज चांगल्या दिशेला घेवून जाणे हा प्रांजळ प्रयत्न प्रसिद्धी विभागाचा आहे. म्हणून वर्षभरात आयोजिलेल्या कार्यक्रमांना खालीलप्रमाणे प्रसिद्ध देण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षात विविध अशा वृत्तपत्रांमधून महाविद्यालयातील कार्यक्रमांना प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न केला आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विविध विभाग व समित्यांचे ४० ते ४५ कार्यक्रम संपन्न झाले. योग दिन, दरेगांव दरी येथे वृक्षारोपन, अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी, गुणवंत विद्यार्थी सत्कार, उद्बोधन वर्ग, महाआरोग्य शिबीर/मा. बागडे नाना वाढदिवस, मॅरेथॉन स्पर्धा, स्वातंत्र्य दिन व्याख्यान, आजीवन शिक्षण विभाग, विद्यापीठ वर्धापन दिन, सामाजिकशास्त्र

अभ्यासमंडळ उद्‌घाटन, महिला तक्रार निवारण समिती व्याख्यान, वाणिज्य मंडळ उद्‌घाटन, विद्यापीठ स्तरीय काव्यवाचन व भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन, पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती, नेहरू युवा केंद्र औरंगाबाद, भाषण स्पर्धा, राष्ट्रीय सेवा योजना शिबीर, मा. बागडे नाना उपस्थिती, पाणी पुरवठा व स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा, महात्मा गांधी व्याख्यानमाला, आजीवन शिक्षण विभाग कार्यशाळा, वस्तू आणि सेवाकर कार्यशाळा, शिवजयंती निमित्त तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा, बहुभाषिक संमेलन, शारीरिक शिक्षण विभाग व ग्रंथालय शास्त्र विभाग राष्ट्रीय परिषद, मराठी भाषा गौरव दिन, समाजशास्त्र विषयाची राष्ट्रीय परिषद या सर्व कार्यक्रमांना प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

त्यापैकी २६ कार्यक्रमांच्या ५६ बातम्या विविध वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यात सर्वाधिक १७ बातम्या दिव्य मराठी या वर्तमानपत्राने दिल्या. तर सकाळ १३, दै. पुढारी ९, दै. महाराष्ट्र टाईम्स ८, दै. पुण्यनगरी ५, दै. लोकमत १, दै. आनंद नगरी १, दै. भास्कर १, दै. देशोन्नती १, या प्रकारे प्रसिद्धी मिळाली.

## सांस्कृतिक विभाग

१) **दिनांक २६ जून २०१७:-** रोजी शाहू महाराज जयंती पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

२) **दिनांक ०१ जुलै २०१७:-** रोजी वसंतराव नाईक यांचा जन्मदिन कृषिदिन म्हणून साजरा करण्यात आला.

३) **दिनांक १० जुलै २०१७:-** रोजी गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यासपीठावर डॉ. मंजूषा नळगीरकर, प्रा. विजय पांडे यांची उपस्थिती होती.

४) **दिनांक २२ जुलै २०१७:-** रोजी श्री संत सावता माळी महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. दत्तात्रय येडले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

५) **दिनांक ०१ ऑगस्ट २०१७:-** रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. सूर्यकांत सांभाळकर (विनायक पाटील महाविद्यालय, कन्नड) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

६) **दिनांक १३ ऑगस्ट २०१७:-** रोजी संस्थापक अध्यक्ष कै. रावसाहेब दांडगे पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

७) **दिनांक ०५ सप्टेंबर २०१७:-** रोजी सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षण दिन म्हणून साजरी करण्यात आली.

८) **दिनांक ०७ सप्टेंबर २०१७:-** रोजी एस. बी. कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद येथे राजयस्तरीय वादविवाद स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या कु. मृणाली अनिल मनोरकर व कु. मानसी गुलाबराव पवार या दोन विद्यार्थीनींचा सहभाग होता.

९) **दिनांक ०८ सप्टेंबर २०१७:-** रोजी युवक महोत्सव पूर्वतयारी म्हणून उद्धबोधन वर्ग घेण्यात आला. याप्रसंगी श्री अरूण विटेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१०) **दिनांक १३ ऑक्टोबर २०१७:-** रोजी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.

११) **दिनांक १४ नोव्हेंबर २०१७:-** रोजी पंडित नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली.

१२) **दिनांक २७ नोव्हेंबर २०१७:-** रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. विजय पांडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसमोर भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन करून त्यांना उद्देशपत्रिकेचे महत्त्व सांगण्यात आले.

१३) **दिनांक १३ डिसेंबर २०१७:-** रोजी एस. पी. कार्यालय, कन्नड येथे महिला सबलीकरण या विषयावरील नाटीकेचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी कन्नडच्या डॉ. आरती सिंह, पोलीस अधिक्षक औरंगाबाद (ग्रामीण) व मनिषा लटपटे (पोलीस उपनिरीक्षक, दामिनी पथक) उपस्थित होत्या.

१४) **दिनांक २९ डिसेंबर २०१७:-** रोजी स्वच्छ भारत मिशन (ग्रा) कक्ष पंचायत समिती फुलंब्री व जिल्हा परिषद, औरंगाबाद आयोजित पाणी पुरवठा व स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेचे आयोजन प्रस्तुत महाविद्यालयात करण्यात आले. यावेळी फुलंब्री तालुक्यातील कनिष्ठ गट व वरीष्ठ गट यांच्या वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. श्री राजेश चव्हाण (तालुका समन्वयक, स्वच्छ भारत मिशन, पंचायत समिती, फुलंब्री), डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. महेश थोरात, डॉ. विजय पांडे, डॉ. मंजूषा नळगीरकर यांनी परीश्रम घेतले.

१५) **दिनांक १२ जानेवारी २०१८:-** रोजी स्वामी विवेकानंद जयंती व मातोश्री जिजाऊ जयंती निमित्त श्री ऋषीबाबा शिंदे यांनी युवक कसा असावा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१६) **दिनांक १६ फेब्रुवारी २०१८:-** रोजी भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांचे Exam Warriors Narendra Modi Speech परीक्षेतील ताणतणावापासून मुक्तता या विषयावरील मार्गदर्शन ११.०० ते १२.०० या वेळेत विद्यार्थ्यांना ऐकविण्यात आले.

१७) **दिनांक १२ मार्च २०१८:-** रोजी यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली.

## केंद्रीय युवक महोत्सव व वार्षिक स्नेहसंमेलन

१) **दिनांक २९ ऑक्टोबर ते ०१ नोव्हेंबर २०१७:-** दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आयोजित केंद्रीय युवक महोत्सवात २० कला प्रकारांमध्ये १९ विद्यार्थी कलावंतांनी सक्रीय सहभाग आणि विविध कला प्रकारांचे उत्कृष्ट असे सादरीकरण करण्यात आले.

२) **दिनांक २४ जानेवारी २०१८:-** रोजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात संगीतरजनी अंतर्गत विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. या वार्षिक स्नेहसंमेलनात एकूण २० विद्यार्थी कलावंतांनी सहभाग नोंदवला.

## स्पर्धा परीक्षा विभाग

१) **ऑगस्ट ते ऑक्टोबर:-** दरम्यान स्पर्धा परीक्षा तासिकांचे नियोजन करण्यात आले. त्यासंबंधीच्या काही तासिका प्राध्यापकांनी घेतल्या आहेत. स्पर्धा परीक्षा विभागात प्रवेशासाठी नोंदणी फॉर्म व प्रवेश फीस (५० रू) विद्यार्थ्यांकडून घेण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये २० विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागात प्रवेश घेतला.

२) **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा:-** महाविद्यालयाने महाविद्यालय व परिसरातील अन्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी दि. १० ऑक्टोबर २०१७ रोजी एकदिवशीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले होते. ज्यात ८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेच्या उद्घाटक म्हणून प्रा. उज्ज्वला वाखुरे (मार्गदर्शक रिलायबल अकॅडमी, औरंगाबाद). उद्घाटन सत्रानंतर झालेल्या दोन सत्रात श्री राहुल नावंदर (युनिक अकॅडमी, औरंगाबाद) यांनी एम. पी. एस. सी. परीक्षा तयारी या विषयावर तर श्री राहुल मिसाळ (संकल्प एज्युकेशन, औरंगाबाद) यांनी बँकींग परीक्षा या विषयावर

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्‌घाटन सत्राचे अध्यक्ष प्राचार्य एस. आर. टकले व समारोप सत्राचे अध्यक्ष श्री अमोल जगदाळे (संचालक सह्याद्री अकॅडमी, फुलंब्री) हे होते.

## आचार्यकुल प्रबोधिनी

१) **सहविचार सभा:-** दि. ४, ५ व ६ ऑगस्ट २०१७ रोजी संस्थेची सैद्धांतिक भूमिका या विषयावर मा. श्री. शामसुंदर नाईक यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी डॉ. सर्जेराव ठोंबरे होते. दि. ५ ऑगस्ट २०१७ रोजी पोलीस उपनिरीक्षक कु. मनिषा लटपटे यांचे व्याख्यान महिला आणि कायदा या विषयावर झाले. अध्यक्षस्थानी सचिव, श्री शामसुंदर नाईक होते. यासोबतच ॲड विलास सोनवणे (हायकोर्ट, औरंगाबाद) यांचे व्याख्यान शिक्षणातून ग्रामविकास या विषयावर झाले. कार्यक्रमाचा समारोप डॉ. एस. आर. टकले यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

२) **आचार्यकुल सहल:-** दि. १५ ऑक्टोबर २०१७ रोजी जळगाव येथील महात्मा गांधी तीर्थ, जैन ॲग्रो पार्क, जळगाव येथे अभ्यास सहल काढण्यात आली.

३) **शिक्षक मदतीचा हात योजना:-** दि. ५ मार्च २०१८ रोजी पर्यंत एकूण १२ प्राध्यापकांचे १४४०० रू. जमा झाले पैकी २९ विद्यार्थ्यांना १३५०० रू. वाटप करण्यात आले. यामध्ये प्रवास खर्च, प्रवेश शुल्क आणि परीक्षा शुल्क चा समावेश आहे.

४) **शोध निबंध / बुक रिव्ह्यु वाचन:-** (१) प्रा. डॉ. राजर्षी पवार यांनी दिनांक १६ डिसेंबर २०१७ रोजी संत ज्ञानेश्वर कृत अमृतानुभव, (२) प्रा. डॉ. दत्तात्रय येडले यांनी दिनांक ३० डिसेंबर २०१७ रोजी डॉ. रामदरश्श मिश्र के उपन्यासों में व्यक्त कृषक जीवन, (३) प्रा. डॉ. रामकिसन लोमटे यांनी दिनांक ०६ जानेवारी २०१८ रोजी भारतीय लोकशाहीतील निवडणूक आयोगाची भूमिका, (४) प्रा. विजय पांडे यांनी दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी असईची लढाई, (५) प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी दिनांक २६ फेब्रुवारी २०१८ रोजी आदिवासी साहित्य स्वरूप व संस्कृती व (६) प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर यांनी दिनांक ०५ मार्च २०१८ रोजी Sustable Development : Integral Humarism by Pandit Deendayal Upadhyay अनुक्रमे वाचन केले.

५) **निरोप समारंभ कार्यक्रम:-** दिनांक ०५ जुलै २०१७ रोजी इंग्रजी विषयाचे प्राध्यापक्र डॉ. राजेंद्र आंबावणे यांची पुणे जिल्हा शिक्षण मंडळांतर्गत महाविद्यालया मध्ये प्राध्यापक पदी निवड झाली. त्यामुळे त्यांना निरोप देण्यासाठीआचार्यकुल प्रबोधिनीच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला.

## क्रांतीगुरू लहुजी सावळे संस्कार केंद्र

१) **नियमित तासिका:-** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालयाच्या वतीने फुलंब्री येथील बाजार पट्टीमध्ये कार्यरत लहुजी साळवे संस्कार केंद्रावर नियमित तासिकाचे आयोजन व कार्यवाही नेमून दिलेल्या प्राधपकांच्या वतीने पूर्णपणे संपन्न झाले.

२) **तीळगुळ वाटप कार्यक्रम:-** दि. १४ जानेवारी २०१८ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने तीळगुळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

३) **कुमारिकांना कपडे वाटप:-** संस्कार केंद्रात नियमित उपस्थित राहणाऱ्या कुमारिकांना प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर यांनी नवरात्र महोत्सवानिमित्त दिनांक २१ नोव्हेंबर २०१७ रोजी नवीन रेडीमेड कपड्यांचे वाटप करण्यात आले.

## कै. आ. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना "कमवा व शिका"

१) **कामकाजाचे स्वरूप:-** सदर योजना ही महाविद्यालयात २००९-१० पासून चालू आहे. सदर योजनेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता ५ विद्यार्थ्यांची मंजुरी विद्यापीठाने दिली आहे. प्रति विद्यार्थ्याला प्रति महिना ४०० रू. (मानधन) दिले जाते. सदर योजना ही सोमवार ते शनिवार असे आठवड्यातून १६ तास (प्रति दिवस २ तास) याप्रमाणे विद्यार्थ्यांकडून कामे करून घेतली जातात.

२) **मंजूर योजना कालावधी:-** माहे ऑक्टोबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ असा एकुण ५ महिने

३) **विद्यापीठाचे मंजूर अनुदान:-** रू. ५०००/-

४) **महाविद्यालयाचे अनुदान :-** रू. ५०००/- असे एकूण रू. १००००/-. त्याप्रमाणे वरील योजनेमध्ये ५ विद्यार्थ्यांची निवड ही अर्ज मागवून मुलाखतीद्वारे करण्यात आली.

५) **योजनेमधील राबविलेले उपक्रम:-** (१) महाविद्यालयीन परिसर स्वच्छता व निगा राखली. (२) कोरफड लागवड प्रकल्प फुलंब्री येथील नामांकित कपुर हर्बल प्रोजेक्ट्स कंपनीच्या सहकार्याने महाविद्यालय परिसरात ३ गुंठे परिसरात जवळपास ६०० कोरफडीचे रोपे लागवड करण्यात आली. सदर कोरफड ही १२ महिने लागवडीनंतर होणारे उत्पादन रू. ४ प्रतिकिलो याप्रमाणे कपुर हर्बल प्रोजेक्ट्स कंपनी ही विकत घेणार आहे. अंदाजे ४ टन उत्पादन होण्याची अपेक्षा आहे. प्रथम छाटनी १२ महिने नंतर दर तीन महिन्याला अशा पद्धतीने हे उत्पादन घेतले जाईल व या उत्पन्नातून ही योजना पुढे सक्षमपणे चालविण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

## प्रवेश समिती

१) **माहिती पुस्तिका छपाई :-** प्रवेश समितीकडून ३० एप्रिल २०१७ रोजी सर्व विभागांचे वार्षिक नियोजन तयार करुन त्यांचे एकत्रिकरण करण्यात आले व ते मे महिण्यामध्ये छपाईसाठी देण्यात आले. १ जून २०१७ रोजी माहिती पुस्तकांची छपाई करण्यात आली. एकूण ५०० माहिती माहितीपुस्तिका छापण्यात आल्या.

२) **कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी:-** १९ जून २०१६ रोजी प्राचार्यांच्या अध्यक्षेतखाली बैठक घेऊन त्यानुसार परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांना प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी समुपदेशनासाठी भेटी दिल्या. प्रत्यक्ष भेटीतून विद्यार्थ्यांना महाविद्यालचे वैशिष्ट्ये सांगण्यात आले. विद्यार्थ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक, वर्ग इत्यादी माहिती संकलित करुन त्यांना महाविद्यालयाचे माहिती पत्रक देण्यात आले व त्या त्या गावातील महत्त्वाच्या ठिकाणी बॅनर लावण्यात आले.

३) **प्रवेशसाठी समित्यांची स्थापना:-** १५ जून रोजी महाविद्यालयाची सुरूवात झाली. त्यानुसार प्रवेशासंबंधीच्या जबाबदारीचे वाटप करण्यात आले. वार्षिक नियोजन, समित्या स्थापन फोटोसह, विविध प्रवर्गासाठी व वर्गासाठी असणाऱ्या शुल्क यांच्या प्रत्येक एक-एक प्रत महाविद्यालयातील सूचनाफलकावर लावण्यात आल्या.

४) **वेळापत्रक:-** दि. १ जुलै २०१६ रोजी महाविद्यालयाचे वेळापत्रक बनविण्यात आले. यात विषय, वर्गखोली, प्राध्यापकांचे नाव यानुसार वेळापत्रकाची एक-एक प्रत सर्वांना देण्यात आली व त्यानुसार त्या त्या विभागाचे विभाग प्रमुख व सहाय्यकांच्या वेळापत्रकाची एक-एक प्रत समितीकडे जमा करुण घेण्यात आली.

५) **विद्यार्थी प्रवेशित संख्या:-** प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची शाखा व वर्गनिहाय संख्या (२०१७-१८)

| वर्ग | बी. ए. | | | बी. कॉम. | | | बी. एस्सी. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| प्रथम वर्ष | ८२ | ५० | १३२ | ६५ | ३१ | १६ | ५५ | ५० | १०५ |
| द्वितीय वर्ष | १६ | २१ | ३७ | १२ | २१ | ३३ | ० | ० | ० |
| तृतीय वर्ष | १४ | २४ | ३८ | २० | १३ | ३३ | ० | ० | ० |
| एकूण | ११२ | ९५ | २०७ | ९७ | ६५ | १६२ | ५५ | ५० | १०५ |

## संशोधन समिती

१) **तज्ञ व्याख्यान:-** डॉ. गणेश कुलकर्णी यांनी दि. २४ जुलै २०१७ या दिवशी संशोधनात ई-सोर्सेसचा वापर या विषयावर महाविद्यालयातील प्राध्यापकांना संगणक कक्षात प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. तसेच डॉ. रमेश मंझा (संगणक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी दि. १९ सप्टेंबर २०१७ रोजी संशोधनात एस. पी. एस. एस. चा उपयोग या विषयावर प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२) **बैठक:-** संशोधन समिती सदस्यांची दि. ३० ऑगस्ट २०१७ रोजी बैठक घेण्यात आली. सदरील बैठकीत मागील इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. प्रत्येक विभागाने सर्वेक्षण करावेत. तसेच MOU साठी प्रयत्न करावेत या सूचना देण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला चर्चासत्र परिषदा / कार्यशाळा या संबंधीचे डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. अश्विन रांजणीकर, डॉ. मंजुषा नळगीरकर यांच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. संशोधन समिती सदस्यांची दि. १३ मार्च २०१८ रोजी दुसरी बैठक घेण्यात आली.

## योग समिती

१) **योगदिन:-** दि. २१ जून २०१७ रोजी जागतिक योगदिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. क्रीडा विभाग, एन.एस.एस. व योग समितीच्या वतीने ह्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. डॉ. संदीप जगताप, राजेंद्र तांदुळजे (योगशिक्षक, पंतजली योग समिती) यांनी महाविद्यालयाच्या मैदानावर सर्व उपस्थितांना प्रात्यक्षिके करुन दाखविले. योगासने, प्राणायाम, ध्यान घेण्यात आले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२) **योगशिबिर:** दि. ३ ऑक्टोबर २०१७ रोजी प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर यांच्या हस्ते योग शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी पतंजलीचे योगसूत्र उलगडून सांगितले. आजच्या स्थितीत योगा विषयीच्या जाणीव जागृती घडवून आणण्याच्या दृष्टीने योग समितीने कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्ती केली; कारण ती काळाची गरज आहे. हे शिबीर दि. ३ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर २०१७ या कालावधीत घेण्यात आले. डॉ. राजश्री पवार यांनी दररोज दुपारी ३.०० ते ४.३० या वेळेत विद्यार्थी वर्गास मार्गदर्शन केले. विविध आसने, प्राणायाम, ध्यान-धारणा या पद्धतीत प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरार्थींची संख्या २५ ते ३० होती.

३) **योगव्याख्यान:-** दि. २९ जानेवारी २०१८ आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री रत्नाकर गोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीवन जगण्याची कला योगाच्या माध्यमातून कशी विकसीत होऊ शकते यावर त्यांनी प्रकाश टाकला. विद्यार्थी दशेपासूनच योग अंगवळणी पाडून घ्यावे असे आवाहन त्यांनी केले. योगातून व्यक्तिमत्त्व विकास कसा साधाणार याविषयी मार्गदर्शन केले. तसेच दिनांक ६ मार्च २०१८ रोजी श्रीमती रूपाली बखले-दहिहंडे (माजी विद्यार्थीनी) यांचे योगाचे महत्त्व या विषयावर व्याख्यान आयोजित

करण्यात आले होते. अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने त्यांनी योग व पंचकर्म याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने योगाचे महत्त्व काय हे पटवून सांगितले.

## प्लेसमेंट सेल (Placement Cell)

१) **दिनांक १९ डिसेंबर २०१७:-** रोजी प्लेसमेंट सेल विभागामार्फत Information about National Career Services या विषयावर डॉ. अनिल जाधव यांनी मार्गदर्शन केले. डॉ. पी. एम. कल्याणकर हे या व्याख्यान सत्रास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर अध्यक्षीयस्थान प्रा. नितीन माळेगावकर यांनी भूषविले.

२) **दिनांक १८ जानेवारी २०१८:-** रोजी श्री रवि राठोड यांनी दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच श्री गजानन काळे यांनी कृषिउद्योग क्षेत्रातील रोजगाराच्या संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

३) **दिनांक १० जानेवारी २०१८:-** रोजी प्रा. रूपेश भावसार (विभाग प्रमुख, फुड प्रोडक्शन, एम.जी.एम. हॉटेल मॅनेजमेंट औरंगाबाद) यांनी Awarness in Hospitality Management या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच प्रो. पुष्पा गोरे यांनी Career Oppertunities in Turisum and Hotel Industry या विषयावर मार्गदर्शन केले.

४) **लेखपाल म्हणून नियुक्ती:-** प्लेसमेंट सेल विभागांतर्गत आप्पासाहेब मेहत्तर, विकास राजपुत, गजानन धनायत या तीन विद्यार्थ्यांची भालेराव ॲण्ड बसैये असोशिएशनमध्ये लेखापाल म्हणून नियुक्ती करण्यात आली.

## सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ

१) **उद्घाटन:-** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी प्रा. डॉ. आश्रुबा गवळी (शिवछत्रपती महाविद्यालय, औरंगाबाद) यांच्या हस्ते करण्यात आले. सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष म्हणून बी. ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी श्री निवृत्ती गाडेकर व उपाध्यक्ष म्हणून श्री सोमीनाथ सहाणे यांची निवड करण्यात आली. प्रमुख अतिथी व वक्ते आश्रुबा गवळी यांनी अभ्यास मंडळ अध्यक्ष व उपाध्याक्षाचे पुष्प देऊन स्वागत केले. डॉ. गवळी यांनी अभ्यास मंडळ उद्घाटन प्रसंगी या अभ्यास मंडळ स्थापनेचा उद्देश स्पष्ट केला.

२) **भित्तीपत्रक:-** दिनांक २ ऑक्टोबर २०१७ रोजी सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने कु. सरला दाढे या विद्यार्थीनीने बनविलेले स्वच्छ भारत या विषयावरील भित्तीपत्रक महात्मा गांधी जयंती कार्यक्रमात प्रकाशित करण्यात आले. या कार्यक्रमात वक्ते श्री बाबासाहेब दाभाडे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले, डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांच्यासह सामाजिकशास्त्राचे विद्यार्थी उपस्थित होते.

३) **लोकशाही पंधरवाडा:-** महाराष्ट्र शासनाने दिनांक २६ जानेवारी २०१८ ते १० फेब्रुवारी २०१८ या कालावधीत लोकशाही पंधरवाडा साजरा करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार लोकशाही विषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने लोकशाही व्यवस्थेची ओळख या विषयावर डॉ. रामकिशन लोमटे व प्रा. बाबासाहेब लहाने यांनी विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. याबरोबरच ग्रंथालया शेजारील फलकावर मतदान यादीत नाव नोंदणी करा व भारतीय लोकशाही मजबूत करा अशा आशयाची सूचना लिहिण्यात आली.

४) **सामान्यज्ञान चाचणी:-** दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी सामान्यज्ञान चाचणी घेण्यात आली. या उपक्रमात एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

५) **चर्चासत्र:-** दिनांक ९ मार्च २०१८ रोजी भारतीय महिलांची स्थिती या विषयावर विद्यार्थ्यांचे चर्चासत्र घेण्यात येणार आहे. दिनांक ८ मार्च या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे निमित्त हे चर्चासत्र घेण्यात आले.

६) **भित्तीपत्रक प्रकाशन:-** सामाजिकशास्त्राचे श्री निवृत्ती गाडेकर यांचे द्वितीय सत्रातील भित्तीपत्रक दिनांक ५ मार्च २०१८ रोजी प्रा. किशोर काळे यांच्या हस्ते प्रकाशित केले.

## Literary Club

1) **Inauguration of Literary Club**:- Literary Club is inaugurated on 31th July in the presence of Dr. Sanjay Rathod (Asst. Professor, Dept. of Hindi, Dr. B.A.M.U. Aurangabad) on the occasion of Premchand Birth Anniversary. The Members of the Literary Club are Miss. Jyoti Ude, Miss. Priyanka Gaikwad and Mr. Laxmikant Dheple

2) **Poster Competition**:- University level intercollegiate poster competitionis arranged jointly by Dept. of Hindi, Dept. of Marathi and Literary Club on the occasion of Hindi Fortninght Celebration.

3) **Bahubhashik Sammelan**:- Multilingual Program on the occasion of $21^{st}$ Feb. i.e. Mother Language Day. Marathi, Hindi, English Department Literary Club & Rajashri Shahu College Pathri, Indraraj College, Sillod & Chetna Arts College, Aurangabad jointly organized Bahubhashk Sammelan on the occasion of Mother Language Day. 14 languages, more than 20 teachers of language and 100 particupants were presents on the occasion.

4) **Annual Magazine Pushpambar**:- In the meeting it is decided that annual issue of Pushpambar is going to be published on Clean India.

## महिला सबलीकरण समिती

१) **महिला आरोग्य तपासणी शिबीर:-** महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या आरोग्य तपासणीसाठी दिनांक २३ सप्टेंबर २०१७ रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. फुलंब्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. फरीन पठाण, डॉ. ताठे, डॉ. सिकंदर इत्यादी चे पथक आले होते. डॉ. फरीन यांनी मुलींना आरोग्य व आहार विषयक माहिती सांगितली. महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या आरोग्याची तपासणी करून त्यांना व्हिटॅमिनच्या गोळ्या देण्यात आल्या. सदरील आरोग्य तपासणी शिबीरात ३५ विद्यार्थीनी सहभाग घेतला.

२) **सावित्रीबाई फुले जयंती:-** निमित्त दिनांक ३ जानेवारी २०१८ रोजी सामुहिक अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

३) **जागतिक महिला दिन:-** निमित्त दिनांक १२ मार्च २०१८ रोजी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शासकीय महाविद्यालयातील डॉ. प्रमिला भुजाडे यांनी महिला सबलीकरणात समाजाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले.

## मराठी विभाग

१) **अभ्यागत तासिका:-** दिनांक ०४ सप्टेंबर २०१७ रोजी श्रीमती स्वाती नेरकर - वाणी व दिनांक ०८ नोव्हेंबर २०१७ रोजी प्रा. संदीप अवसरमल यांनी अभ्यागत तासिका घेतल्या.

२) **भित्तीपत्रक:-** दिनांक १३ ऑक्टोबर २०१७ रोजी श्रीमती उषा दांडगे व दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ रोजी श्रीमती रेखा मेश्राम यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

३) **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा:-** दिनांक ०१ जानेवारी २०१८ ते १५ जानेवारी २०१८ या दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मोठ्या जल्लोषात मानण्यात आला. यानिमित्ताने ग्रंथदिंडी काढण्यात आली. ज्ञानेश्वरी गाथा, राज्यघटना, बायबल, कुराण हे ग्रंथ विद्यार्थ्यांना डोक्यावर घेऊन मराठी भाषेचा जयजयकार करीत महाविद्यालयाच्या शेजारच्या वस्तीतून दिंडी मिरविण्यात आली. या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये काव्यवाचन:- १) कु. अंकिता गायके (प्रथम), शेख शहारूख (द्वितीय); वक्तृत्व:- १) कु. मृणाली मनोरकर (प्रथम), २) कु. मंगल सुरभैय्ये (द्वितीय); शुद्धलेखन:- १) कु. मृणाली मनोरकर (प्रथम), २) कु. रूपाली नागरे (द्वितीय) या प्रमाणे पार पडला. पंधरवड्याचे उद्घाटन प्रा. संदीप अवसरमल यांच्या हस्ते करण्यात आले. तर समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. ऋषीबाबा शिंदे (मॉडेल कॉलेज, घनसांवगी) हे उपस्थित होते. सदरील अहवाल शासनास पाठविण्यात आला.

४) **मराठी भाषा सप्ताह:-** दिनांक १७ ते २३ फेब्रुवारी २०१८ या दरम्यान मराठी भाषा सप्ताह महाराष्ट्र शासनाच्या आदेशानूसार पाळण्यात आला. यानिमित्ताने सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. निकालामध्ये कु. मृणाली मनोरकर (प्रथम) तर कु. मंगल सूरभैय्ये (द्वितीय) क्रमांक पटकाविला. तसेच कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन विद्यार्थ्यांनी केलेल्याचा निकालामध्ये लक्ष्मीकांत ढेपले (प्रथम) तर अंकिता गायके (द्वितीय) यांनी क्रमांक पटकाविला. सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना नाट्यवाचन केले. अधिकाधिक मराठी शब्दांचा वापर सोशल मिडियावर करण्यासाठीची वचनबद्धता प्रतिपादन केली.

५) **मातृदिन:-** दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ रोजी महाविद्यालयात जागतिक मातृभाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चेतना कॉलेज, सावंगी, इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड, राजर्षी शाहु कॉलेज, पार्थी, कोहिनूर महाविद्यालय, खुलताबाद यांच्या संयुक्त विद्यामाने हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. हमीद खान होते तर अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सर्जेराव ठोंबरे होते. प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांची होती. याप्रसंगी विविध भाषेतील (एकूण १५ भाषा) सादरीकरण वेगवेगळ्या महाविद्यालयातून एकूण ४० प्राध्यापक व विद्यार्थी यांनी हजेरी लावली. (विविध भाषा विषयाचे) सगळ्यांचे ग्रंथ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

६) **मराठी भाषा गौरव दिन:-** दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीमती मीरा केदारे (सहशिक्षिका, संत सावता गुरूकुल, फुलंब्री) यांनी मातृभाषेवर प्रेम करा, तिचा वापर करतांना लाजू नका, इंग्रजी येत नसल्याचा न्यूनगंड बाळगू नका असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर होते.

७) **अभ्यास सहल:-** दिनांक ०६ मार्च २०१८ रोजी भाषा विषयाची अभ्यास सहल फुलंब्री येथील सावता मंदिरात घेऊन जाण्यात आली. या सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी सावता महाराजांचे अभंग वचान केले. तत्पूर्वी डॉ. राजश्री पवार व डॉ. अश्विन रांजणीकर यांनी सावता महाराजांच्या चरित्रावर प्रकाश टाकला. या सहलीमध्ये २५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

## हिंदी विभाग

१) **प्रेमचंद जयंती समारोह:-** दिनांक ३१ जुलै २०१७ रोजी प्रा. डॉ. संजय राठोड (हिंदी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी प्रेमचंदाचे व्यक्तित्त्व व साहित्यिक कृतित्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.

२) **हिंदी सप्ताह:-** दिनांक १४ ते २० सप्टेंबर २०१७ हिंदी सप्ताह निमित्त विभागाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात दिनांक १४ सप्टेंबर २०१७ रोजी काव्य लेखन व हिंदी शेरसुविचार स्पर्धा, दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी निबंध व कहानी लेखन स्पर्धा, दिनांक १६ सप्टेंबर २०१७ काव्यवाचन व कहानी कथन स्पर्धा, दिनांक १८ सप्टेंबर २०१७ हमारा महाविद्यालय, या विषयावर भाषण स्पर्धा व दिनांक १९ सप्टेंबर २०१७ रोजी लेखन शुद्धता व हिंदी सामान्यज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

३) **विश्वविद्यालय स्तरीय काव्यवाचन व भित्तीपत्रिका स्पर्धा:-** दिनांक १९ सप्टेंबर २०१७ रोजी घेण्यात आली. यामध्ये राजर्षी शाहु महाविद्यालय पार्थी, संत सावता गुरूकुल फुलंब्री, शिवछत्रपती महाविद्यालय, औरंगाबाद, चेतना कला महाविद्यालय हर्सुल सावंगी औरंगाबाद, दगडोजीराव देशमुख महाविद्यालय वाळुज व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील एकुण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. काव्यवाचन स्पर्धेत देशभक्तीपर कवितांचे वाचन करण्यात आले. यात अनुक्रमे प्रथम क्रमांक मानसी पाटील (श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंबी), द्वितीय कु. मंगल पळसकर (चेतना कला महाविद्याल) तर तृतीय क्रमांक कु. पूजा चित्रक (राजर्षी शाहू महाविद्यालय पार्थी) यांनी मिळविला. भित्तीपत्रिका स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम क्रमांक पवन लेंभे (चेतना कला महाविद्यालय), द्वितीय अशा चौधरी (शिवछत्रपती महाविद्यालय) तर तृतीय क्रमांक स्वप्नील लाड (श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय) यांनी पटकाविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एस. आर. टकले तर परीक्षक म्हणून प्रा. डॉ. विशाल शर्मा (हिंदी विभाग, चेतना कला महाविद्यालय) प्रा. डॉ. राजश्री पवार, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ व प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर हे उपस्थित होते. उपस्थित विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

४) **भित्तिपत्रिका:-** विद्यार्थ्यांद्वारा निर्मित भित्तीपत्रिकेचे प्रकाश दिनांक १९ जुलै २०१७ व द्वितीय भित्तीपत्रिकेचे प्रकाशन दिनांक ०९ जानेवारी २०१८ रोजी करण्यात आले.

५) **अतिथी अध्यापन वर्ग:-** दिनांक १९ जुलै २०१७ रोजी प्रा. डॉ. विशाल शर्मा (हिंदी विभाग, चेतना महाविद्याल) यांनी हिंदी साहित्य : आधुनिक आयाम व दिनांक ०९ जानेवारी २०१८ रोजी प्रा. डॉ. माजिद शेख (हिंदी विभाग, प्रतिष्ठाण महाविद्यालय, पैठण) यांनी उपन्यास साहित्य (हिंदी) यावर अतिथी अध्यापन वर्ग घेतला.

६) **हिंदी अध्यापन में सूचना प्रौद्योगिकी का प्रयोग:-** दिनांक २४ ऑगस्ट २०१७ रोजी हिंदी व्याकरण - छंद व दिनांक १० जानेवारी २०१८ रोजी वार्तांकन, प्रयोजनमूलक हिंदी घेण्यात आले.

७) **छात्र अभ्यास सहल:-** दिनांक ०६ मार्च २०१८ रोजी श्री संत सावता महाराज मंदिर, फुलंब्री येथे विद्यार्थ्यांची अभ्यास सहल काढण्यात आली. श्री संत सावता माळी महाराजांचे अभंग या विषयी जागरूकता वाढविण्यात आली.

## इंग्रजी विभाग

1) **Appointment of Teacher on CHB**:- Mr. Dilip Madavi is appointed in the college on the CHB basis in the department of English.

2) **Time Table**:- From the Ist of August lectures were started as per the time table.

3) **Guest Lectures**:- Arranged Guest Lectures for the students of English, A) Dr. Pramod Pawar, Asst. Professor, Sant Dnyaneshwar College, Soygaon delivered a lecture on Phonetics on 7th Oct. 2017, B) Mr. Dhananjay Deshmukh, Asst. Professor, Shivaji College, Kannad delivered a lecture on Uses of Tenses on 14th Feb. 2018

4) **Wall Poster Publication**:- a) Phonetics on 7th Oct. 2017 and Usese of Tenses on 14th Feb. 2018.

5) **Study Tour**:- Department of Marathi, Hindi & English unitedly organized a study tour on 6th March 2018 at the Savta Mandir Phulambri on the occasion of Nath Sasthi. Dr. Rajashri Pawar portrayed the biography of Sant Savta Mali and Dr. Ashwin Rajanikar & Dr. Dattatraya Yedle spoke about the Abhanga of Savta Maharaj.

## इतिहास विभाग

१) **मुलाखत:-** दिनांक २२ जुलै २०१७ रोजी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी मुलाखत घेण्यात आल्या. दिनांक ०१ ऑगस्ट २०१७ रोजी तासिका तत्त्वावर प्रा. दिनेश कचकुरे इतिहास विभागात रूजू झाले.

२) **वेळापत्रकाची विभागणी:-** दिनांक १ ऑगस्ट २०१७ विभागप्रमुख व तासिका तत्त्वावरील प्राध्यापक यांच्या तासिका विभागणीनुसार वेळापत्रकाचे नियोजन करण्यात आले.

३) **अतिथी व्याख्यान:-** दिनांक १६ ऑगस्ट २०१७ रोजी श्री उमेश नवल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे व दिनांक ०६ मार्च २०१७ रोजी प्रा. सर्जेराव बनसोडे या दोन अतिथींचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

४) **भित्तिपत्रकांचे प्रकाशन:-** दिनांक १७ सप्टेंबर २०१७ रोजी लहूजी साळवे, सोमिनाथ सहाने, निवृत्ती गाडेकर, सरला दाढे या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शाहिस्तेखानाची स्वारी व मिर्झाराजे जयसिंगाची स्वारी या दोन भित्तिपत्रकांचे प्रकाशन प्रा. काकासाहेब डक यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच दिनांक ०६ मार्च २०१८ रोजी सोमिनाथ सहाने, निवृत्ती गाडेकर, सरला दाढे या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पुरातत्वशास्त्र, संग्रहालय शास्त्र या भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्रा. सर्जेराव बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

५) **हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिन:-** दिनांक १७ सप्टेंबर २०१७ रोजी प्रा. काकासाहेब डक यांचे हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त भाषण आयोजित करण्यात आले होते.

६) **छत्रपती शिवाजी महाराज जयंती:-** दिनांक २० फेब्रुवारी २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने तालुकास्तरीय वत्कृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

७) **प्रकल्प सादरीकरण:-** दिनांक १० ते १२ मार्च २०१८ दरम्यान बी. ए. तृतीय वर्षाच्या इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण घेण्यात आले.

८) **शैक्षणिक सहल:-** दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी पाल येथील तेराव्या शतकातील हेमाडपंती महादेव मंदिर येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यात १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## राज्यशास्त्र विभाग

१) **युवक नेतृत्व विकास शिबीर:-** महाविद्यालयीन युवकांमध्ये नेतृत्व गुण विकसीत व्हावेत या उद्देशाने एक दिवशीय युवक नेतृत्व विकास शिबीर आयोजित करण्यात आले. दिनांक ०८ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात हे शिबीर संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन दुपारी १२.३० वाजता झाले.

उद्घाटक व बीजभाषक म्हणून प्रा. डॉ. आश्रुबा गवळी, शिवछत्रपती महाविद्यालय, औरंगाबाद हे उपस्थित होते. व्यासपीठावर वक्ते म्हणून प्रा. डॉ. कैलास इंगळे, राजर्षी शाहु महाविद्यालय, पार्थी, प्रा. विजय पांडे (प्रस्तुत महाविद्यालय) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुभाष टकले उपस्थित होते. डॉ. आश्रुबा गवळी यांनी व्यक्तीमत्व विकास या विषयावर बीजभाषण दिले. त्यानंतर उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. कैलास इंगळे यांनी संभाषण कौशल्य व नेतृत्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात प्रा. विजय पांडे यांनी वेळेचे व्यवस्थापन या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांची गटचर्चा घेण्यात आली. आदर्श नेतृत्व याविषयी विद्यार्थ्यांनी चर्चा केली. आपली मते व्यक्त केली. चर्चेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. शेवटी बी. तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु. निशा पांचाळ यांनी आभार मानले व शिबिराची सांगता झाली.

२) **भित्तीपत्रक प्रकाशन (सत्र पहिले):-** दिनांक १७ सप्टेंबर २०१७ रोजी राज्यशास्त्र विषयाच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. काकासाहेब डक व प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांच्या हस्ते करण्यात आले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिन कार्यक्रमाच्या वेळी हे प्रकाशन करण्यात आले. प्रकाशनाच्या प्रसंगी राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांच्यासह विद्यार्थी निवृत्ती गाडेकर, कु. सरला दाढे, सहाने हे विद्यार्थी उपस्थित होते. भारतातील घटकराज्यांची पुनर्रचना या शिर्षकाचे हे भित्तीपत्रक सदरील विद्यार्थ्यांनी बनविले होते.

३) **अतिथी व्याख्यान (सत्र पहिले):-** दिनांक २२ सप्टेंबर २०१७ रोजी राज्यशास्त्र विभागात प्रा. डॉ. आर. के. पवार (शिवाजी महाविद्यालय, कन्नड) यांचे नागरिकत्व आणि हक्क या विषयावर अतिथी व्याख्यान झाले.

४) **विद्यार्थी चर्चासत्र:-** दिनांक २६ सप्टेंबर २०१७ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ या विषयावर राज्यशास्त्र विभागात विद्यार्थ्यांचे चर्चासत्र घेण्यात आले. मुख्यमंत्र्यांची निवड, मंत्रीमंडळ निर्मिती याविषयी चर्चेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

५) **महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती:-** महाविद्यालयात दिनांक ०२ ऑक्टोबर २०१७ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती राज्यशास्त्र विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील कर्मचारी श्री बाबासाहेब दाभाडे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे विचार व कार्य याविषयी आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला.

६) **अतिथी व्याख्यान (दुसरे सत्र):-** दिनांक ५ मार्च २०१८ रोजी द्वितीय सत्रातील अतिथी व्याख्यान राज्यशास्त्र विभागात झाले. प्रा. किशोर काळे (देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद) यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी भारतीय लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

७) **भित्तीपत्रक प्रकाशन (दुसरे सत्र):-** द्वितीय सत्रातील भित्तीपत्रकाचे प्रकाशन अतिथी व्याख्यान देण्यासाठी आलेल्या प्रा. किशोर काळे यांच्या हस्ते केले. भारताच्या राज्यघटनेतील मुलभूत अधिकारी या शिर्षकाचे भित्तीपत्रक राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी बनविले होते.

८) **प्रकल्प सादरीकरण:-** बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या मख्य विषयाच्या प्रकल्पाचे सादरीकरण दिनांक १२ मार्च २०१८ रोजी करण्यात आले. परीक्षक म्हणून प्रा. किरण धनेधर (राजर्षी शाहु महाविद्यालय, पार्थी) हे उपस्थित होते.

## समाजशास्त्र विभाग

१) **अतिथी व्याख्यान:-** दिनांक ४ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ. संग्राम गुंजाळ (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी समाजशास्त्र विषयातील व्यावसायिक संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच दिनांक ०९ जानेवारी २०१८ रोजी डॉ. साहेबराव हिवाळे (समाजशास्त्र विभाग, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर) यांनी भारतीय लोकशाही आणि भारतीय राज्यघटना या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२) **भित्तीपत्रक प्रकाशन:-** दिनांक १७ सप्टेंबर २०१७ रोजी भारतातील कुपोषण एक गंभीर समस्या या विषयाचे भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले. व दिनांक २६ जानेवारी २०१८ रोजी दहशतवाद : एक जागतिक समस्या या विषयाचे भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले.

३) **गटचर्चा व सेमिनार:-** दिनांक १४ सप्टेंबर २०१७ रोजी बी. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना या विषयावर सेमिनार घेण्यात आले. तसेच दिनांक २३ सप्टेंबर २०१७ रोजी बी. ए. द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची कुपोषण व महिला आरोग्य या विषयावर गटचर्चा घेण्यात आली.

४) **अभ्यास सहल:-** समाजशास्त्र विभागाची दिनांक ९ डिसेंबर २०१७ रोजी बाबा भांड यांच्या गिरनेर तांडा येथील अपंग व मुकबधीर मुलांच्या निवासी शाळेत अभ्यास सहल नेण्यात आली. सदरील सहलीत १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

५) **सामंजस्य करार:-** महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाशी दिनांक २३ सप्टेंबर २०१७ रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

६) **सामाजिक सर्वेक्षण:-** समाजशास्त्र विभागाने जानेवारी २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात ग्रामीण महिलांमधील अंधश्रद्धा या विषयावर सामाजिक सर्वेक्षण केले.

## अर्थशास्त्र विभाग

१) **अतिथी व्याख्यान:-** दिनांक १३ ऑगस्ट २०१७ रोजी दारिद्र्य व बेरोजगारी या विषयावर डॉ. गणेश गांवडे यांनी व्याख्यान दिले. तर दिनांक १० मार्च २०१८ रोजी डॉ. मिसाळ दिलीप (अर्थशास्त्र विभाग प्रमुख, चेतना महाविद्यालय, सावंगी) यांनी संशोधन पद्धती या विषयावर अतिथी व्याख्यान दिले.

२) **भित्तीपत्रक प्रकाशन:-** दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ रोजी GST या विषयावर दोन भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. एक भित्तीपत्रक कु. ज्योती उदये या स्वयंसेविकेने तर दुसरे भित्तीपत्रक कु. प्रियंका गायकवाड या विद्यार्थीनीने तयार केले. सदरील भित्तीपत्रके GST वरील राज्यस्तरीय कार्यशाळेच्या पार्श्वभूमीवर करण्यात आले.

३) **पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती:-** दिनांक २५ सप्टेंबर २०१७ रोजी पंडित दीनदयाळ यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा परिषद प्रशाला गिरसावळी येथील सहशिक्षक कैलास गिरी यांनी पंडित दीनदयाळ यांचे एकात्म मानवदर्शन विषयक विचार या विषयावर भाष्य केले. तर डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी पंडित दीनदयाळ यांच्या व्यक्तीमत्त्वाचे विविध पैलू या विषयावर व्याख्यान दिले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी केले. सुत्रसंचलन कु. सपना सोळुंके व कु. मानसी पवार यांनी केले तर आभार डॉ. अश्विन रांजणीकर यांनी मानले.

४) **क्षेत्र पाहणी:-** अर्थशास्त्र विभागाच्या वतीने रेशीम शेतीचा शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवरील परिणाम या शिर्षकास धरून डोंगरगाव (कवाड) येथील २० रेशमी उत्पादक शेतकऱ्यांची अनुसूचीच्या माध्यमातून माहिती गोळा केली. २०१७-१८ या वर्षात पीक कर्ज माफीचा विषय अधिक चर्चेला गेल्याने पीक कर्ज या शिर्षकाखाली पीक कर्ज मंजूरी प्रक्रीया, कर्ज माफी, किसान क्रिडीट अनुषंगाने दुसरी क्षेत्र पाहणी फुलंब्री तालुक्यातील बिल्डा व दरेगाव (दरी) या गावत केली.

५) **सामजस्य करार:-** महाविद्यालयाचा अर्थशास्त्र विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने सामजस्य करारास दिनांक १३ डिसेंबर २०१७ च्या पत्रानूसार परवानगी मिळाली.

## वाणिज्य विभाग

१) **स्वागत समारंभ:-** दिनांक २४ ऑगस्ट २०१७ रोजी बी. कॉम द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी बी. कॉम प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या स्वागत कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वत:चे मनोगते व्यक्त करून एकमेकांची ओळख करून घेतली आणि वाणिज्य मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवडही या कार्यक्रमात करण्यात आली.

२) **वाणिज्य मंडळाचे उद्‌घाटन:-** दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी प्रा. जयश्री सुर्यवंशी (वाणिज्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी वाणिज्य मंडळाचे उद्‌घाटन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक श्री राजेंद्र सुर्यवंशी हेही उपस्थित होते.

३) **अभ्यागत तासिका:-** दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ. विलास इप्पर (वाणिज्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी वाणिज्य विषयातील नवीन प्रवाह या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी डॉ. अनिल जाधव यांनी Function of Sequrities and Exchange board of India या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

४) **भित्तीपत्रक:-** प्रा. जयश्री सुर्यवंशी यांच्या हस्ते वाणिज्य मंडळ उद्‌घाटन प्रसंगी दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी वस्तु आणि सेवा कर या विषयावर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. तसेच दिनांक १२ मार्च २०१८ रोजी प्रा. डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते E-commerece wibe side या विषयावर भित्तीपत्रक तयार करून त्याचे विमोचन करण्यात आले.

५) **औद्योगिक सहल:-** औद्यागिक सहलीचाच एक भाग म्हणून दिनांक ०६ जानेवारी २०१८ रोजी महाराष्ट्र ट्रेड फेअर आणि महाॲग्रो कृषिप्रदर्शनाला विद्यार्थ्यांनी भेट दिली.

६) **सेमिनार:-** दिनांक २७ सप्टेंबर २०१७ रोजी बी. कॉम च्या विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

## Department of Physics

1) **Sciences Club Inaugurations Function**:- The science club was inaugurated at college dated 30 Oct 2017 On occasion of inauguration program Dr. Bandewar (Rajshri Shahu college, Pathri) was present as chief guest. Sir had given the valuable speech on the scope of science to student. The Principal of our college Dr. S. R. Takle was present as chairman of inauguration function. They also guide the student. Introductory presentation was given by Asst. Prof. R. P. Bibe. Anchoring of program is done by Ashwini Barwal and the vote of thanks is done by Dr. Durgesh Phulwade.

2) **Guest Lecture**:- For the development of student we were arragnged the Guest lecture. To deliver the lecture in subject physics we invite Asst. Prof. R. K. Kakde as Guest lecturer. He delivered their valuable lecture on the topic basic concept of physic. Students are really inspired by the lecture.

3) **Educational Tour**:- Educational tour plays important role in development of interest towards environment. We arranged educational tour for B.sc first year students on date 10 Feb. 2018 at Phulambri lake. We gave the information about phytoplankton and zooplankton (Algae and Fishes). We are collected water sample form the lake for the study of water micro and macro organisms. We are also study the various medicinal plants and collected its sample for herbarium. Students also observed environmental biodiversity. All students gave response and enjoyed also.

## Department of Chemistry

1) **Starting**: B.Sc. Ist year are progressively in academic year 2017-18 in our college. There are two groups (Chemistry - Botany - Zoology) and (Physics - chemistry - Mathematics) are studied in our college.

2) **Key Scientific Problems**:- The department has been engaged in imparting the highest level and quality of academic education and has focused upon addressing key scientific problems, which have gathered appreciation and recognition.

3) The department has well equipped laboratories in the fields of organic and inorganic and physical chemistry.

4) **Foundation of Science Club**:- Academic year 2017-18 the science club is established in department of science. For this science club student committee are selected Chairman - Ashwini Barwal, Vice chairman - Amol Shinde, Member - Divya Dhangare, Amol Dakle and Shivam Jadhav

5) **Inaugaration of Science Club**:- The science club was inaugurated dated 03 Oct 2017 occasion of inauguration program Dr. Bandewar (Rajshri Shahu college pathri) was present as chief geust. He said the valuable speech on the scope of science to student.

6) **Pre- Semester Exam**:- For the improvement of writing skill of student and they understand the question paper patten of university, we had conduct the pre-semester exam. Student has lots of advantage of this exam.

7) **Guest Lecture**:- For the development of student we were arranged the Guest lecture. To deliver the lecture in subject chemistry we invite Asst. Prof. P. R. Kale (Rajshri Shahu college Pathri). He delivered their valuable lecture on the topic Basic concept of Chemistry. Student are really inspired by the lecture of Prof. P. R. Kale.

## Department of Zoology

1) **Sciences Club Inauguration Function**:- The science club was inaugurated on date 03 Oct. 2017. On occasion of inauguration program. Dr. Bandewar Sir and Dr. Gaikwad Sir from Rajshri shahu college Pathri was designated as chief guest. They had given the valuable speech on the scope of science to student.
2) **Guest Lecture**:- On date 23 Jan. 2018 for the development of student we arragnged the Guest lecture. To deliver the lecture in subject Zoology. We invite Asst. Prof. Yogesh Reddy from Deogiri College, Aurangabad as a Guest lecturer. He delivered their valuable lecture on the topic Genetics. Students are really inspired by the lecture of Asst. Prof. Yogesh Reddhy.
3) **Seminar for Students**:- Seminars are very important for the development of students. Students get stage dariong and also go through syllabus which helps in exam to get good scores. Form 06 Feb. 2018 we started taking seminars on Zoology. Our students was enthusiastically participated in delivering the seminar on various topics of Zoology.
4) **Poster Inauguration Function**:- We started poster presentation which will help students to think subjects in different ways. Students will also begin to think of applications of subjects which will help in future for research purpose. On dated 10 Feb. 2018 We inaugurated Posters presentation in the presence of Sinkar Sir. Our students was enthusiastically participated in poster presentation. Students design poster in various areas of Zoology and present it successfully.
5) **Educational Tour**:- Educational Tour plays important role in development of interest towards environment. We arrange educational tour for B.Sc. Ist year students on date 10 Feb. 2018 at Phulambri Lake. We gave the information of fresh water fishes to students. Students also observed environment diversity. All students gave good response and enjoyed also.
6) **Pre-Exam For I Semester**:- From academic year 2017-18, We firstly arranged the Pre-exam for the preparation of final exam. Students gave good response for it. All students attempted Pre-exam and score good marks.

## Department of Botany

1) **Inaugaration of Science Club**:- The science club was inaugurated at dated 03 Oct. 2017. On occasion of inauguration program Dr. Shashikant Bandewar (Rajshri Shahu college Pathri) was present as chief guest. He had given the valuable speech on the scope of science to student.
2) **Pre-Semester Exam**:- For the improvement of writing skills of students and they understand the question paper pattern of university, we had conduct the pre-semester exam. Student has lots of advantage of this exam.

3) **Guest Lecture**:- For the development of student we were arranged the Guest lecture. To deliver the lecture in subject Botany we invite Asst. Prof. Tanmanykumar V. Patil (Vivekanand Sr. College, Aurangabad) as Guest lecture. He delivered their valuable lecture on the topic Tissue system in Plant. Students are really inspired by the lecture of Prof. T. V. Patil.

4) **Poster Presentaion**:- Our student was enthusiastically participated in poster presentation. Students design poster in various areas of Botany and present it successfully.

5) **Botanical Tour**:- We had arrange the botanical tour for the students to know the different species of plant and their botanical characteristics in the field. Botanical tour plays important role in development of interest to ward environment. We arranged educational botanical tour for B.Sc first year students on date 10 Feb. 2018 at Phulambri lake. We gave the information about phytoplankton and zooplankton (Algae and fishes). We are collected water sample from the lake for the study of water flora and fauna. We are also studied various medicinal plants and collects its sample for herbarium. Students also observed environmental biodiversity. All students gave response and enjoy also.

## Department of Mathematics

1) **Inaugaration of Science Club**:- The Science club was inaugurated at dated 03 Oct. 2017. On occasion of inauguration program Dr. Bandewar (Rajshri shahu college Pathri) was present as chief guest. He had given the valuable speech on the scope of science to student.

2) **Pre-Semester Exam**:- For the improvement of writing skill of students and they should understand the question paper pattern of university, we had conduct the pre-semester exam. Student has lots of advantage of this exam.

3) **Guest Lecture**:- For the development of student we had arranged the Guest lecture. To deliver the lecture in subject Mathematics. We invite Asst. Prof. L. B. Shinkar, (Govt. Engineering collge of Aurangabad) as guest lecture. He delivered his valuable lecture on the topic of Basic concepts of Mathematics. Students are really inspired by the lecture of Prof. L. B. Shinkar.

4) **Poster Presenation**:- Our student was enthusiastically participated in poster making. Student design poster in various areas of Mathematics and present it successfully.

## क्रीडा व शारीरिक विभाग

१) **आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सहभाग:-** या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने १४ क्रीडा प्रकाराची फिस रूपये ५००/- भरलेली होती. त्यापैकी १४ क्रीडा प्रकारात एकूण ११६ विद्यार्थी सहभागी झाले.

| अ.क्र. | क्रीडा प्रकार | सहभागी मुले | सहभागी मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | कबड्डी | ११ | - | ११ |
| २ | बॉक्सींग | ५ | - | ४ |
| ३ | बॅडमिंटन | ५ | - | ५ |
| ४ | तायकॉन्दो | - | १ | १ |
| ५ | मैदानी स्पर्धा | ७ | ७ | १४ |
| ६ | क्रॉस कन्ट्री | ६ | ४ | १० |
| ७ | बॉल बॅटमिंटन | ५ | - | ५ |
| ८ | सॉप्टबॉल | ११ | - | ११ |
| ९ | आर्चरी | ४ | ४ | ८ |
| १० | तलवारबाजी | - | ५ | ५ |
| ११ | कुस्ती | ४ | २ | ६ |
| १२ | पावर लिप्टींग / वेटलिप्टींग | ४ | - | ४ |
| १३ | हॉकी | १६ | १६ | ३२ |
| १४ | लॉन टेनिस | - | - | - |
| | एकूण | ७८ | ३८ | ११६ |

२) **दैनंदिन खेळाचे तास व स्पर्धा प्रशिक्षण शिबीर:-** विद्यार्थ्यांनी मोकळा वेळ योग्य पद्धतीने वापरावा व सर्व विद्यार्थ्यांना विभागात उपलब्ध असलेल्या क्रीडा साहित्याचा लाभ घेता यावा यासाठी वेळापत्रकात खेळांच्या तासाचे नियोजन केले गेले. त्यानूसार बी. ए. प्रथम, द्वितीय व तृतीय तसेच बी. कॉम. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे दैनंदिन खेळाचे तास दुपारी ३.३० नंतर नियोजनात घेतले गेले. विभागातील क्रीडा साहित्याचा योग्य तो वापर विद्यार्थ्यांनी करून घेतला खेळाच्या तासांना विद्यार्थ्यांनी वरील क्र. १ मधील खेळ खेळले गेले. तसेच स्पर्धा कालावधी मध्ये विद्यार्थ्यांना सकाळी ७.०० ते ९.०० व सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत महाविद्यालयात व विभागीय क्रीडा संकूल औरंगाबाद येथे विभागामार्फत प्रशिक्षण दिले.

३) **आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड चाचणी:-** वर्षाच्या सुरवातीलाच आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी विभाग प्रमुखाकडे नावे नोंदवली. काही खेळांसाठी कमाल सहभाग संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली. त्यानुसार उत्तोमोत्तम, अधिक होतकरू व नियमित खेळाडूंना संधी मिळावी हा हेतू समोर ठेवून काही खेळांसाठी निवड चाचणी घ्यावी लागली. निवड चाचणीसाठी विद्यार्थ्यांना शारीरिक क्षमता चाचणी, कौशल्य चाचणी व मैदानावरील दैनंदिन उपस्थिती व वर्तन याचे निष्कर्ष लावले गेले.

४) **महाविद्यालय अंतर्गत क्रीडा स्पर्धा:-** महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक क्रीडा प्रकारांचा अनुभव घेता यावा तसेच उदयोन्मुख खेळाडुंना अधिक प्रेरणा मिळावी या हेतूने महाविद्यालयात विविध दिवसांचे औचित्य साधून क्रीडा स्पर्धाचे आयोजन केले गेले. वर्षभर खालीलप्रमाणे खेळांचे आयोजन केले गेले.

क्रीडा दिन - २९ ऑगस्ट - चेस व टेबल टेनिस - सहभागी खेळाडू - १२ मुले, ६ मुली, वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन - ३० मुले व १३ मुलींचा सहभाग.

५) **आंतरराष्ट्रीय योगा दिवस:-** दि. २१ जून २०१७ रोजी क्रीडा विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये क्रीडा विभाग प्रमुख डॉ. संदीप जगताप यांनी प्रात्यक्षिके सादर केली.

६) **पोलीस, आर्मी प्रशिक्षण:-** क्रीडा विभागाच्या वतीने व कॉन्फिडन्स करिअर ॲकडमीच्या सहकार्याने तीन महिने पोलीस व आर्मी भरतीपूर्व प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. त्यामध्ये ४० मुली व ५२ मुलांनी सहभाग नोंदविला.

७) **मॅराथॉन स्पर्धा:-** १८ऑगस्ट २०१७ रोजी क्रीडा विभागाच्या वतीने मा. ना. श्री हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १७ ऐवजी १८ रोजी भव्य मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये २,३,५ किलोमीटर अंतरामध्ये सुमारे १३२७ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन मा. श्री सुहासभाऊ सिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी अनुराधा चव्हाण, उपमहापौर विजय औताडे, संस्थेचे सचिव शामसुंदर नाईक, आंतरराष्ट्रीय पंच सौ. संजिवणी दिल्लीकर, डॉ. फुलचंद सलामपूरे, क्रीडा भारतीचे श्री अशोक यादव, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले आदींची उपस्थिती होती.

८) **आंतरमहाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धेचे आयोजन:-** दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व महाविद्यालय क्रीडा विभागाच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये २१ महाविद्यालयातील ५८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठ क्रीडा संचालक प्राचार्य डॉ. प्रदीप दुबे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी पोलीस निरीक्षक फुलंब्री श्री बापुसाहेब महाजन, पोलीस उपनिरीक्षक मनिषा लटपटे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सौ. आर. कुर्मी, डॉ. सर्जेराव ठोंबरे, बोर्ड ऑफ स्टडी मेंबर शारीरिक शिक्षण डॉ. गोविंद कदम, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले आदींची उपस्थिती होती. स्पर्धेचे बक्षीस वितरण श्री राम बनसोड यांच्या हस्ते झाले.

९) **तालुकास्तरीय स्पर्धा:-** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातर्फे ३ तालुका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सुमारे १४३ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

१०) **अतिथी व्याख्यान:-** शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यान घेण्यात आले. यामध्ये डॉ. राम जाधव, राजर्षी शाहु महाविद्यालय पार्थी यांनी मार्गदर्शन केले.

## ग्रंथालय विभाग

१) **सभासद:-** या वर्षात ग्रंथालय विभागामध्ये बी. ए., बी. कॉम व बी. एस्सी या वर्गातील जवळपास २०५ विद्यार्थी सभासद आहे. १२ शिक्षक व ८ शिक्षकेत्तर कर्मचारी सभासद आहेत.

२) **ग्रंथ खरेदी:-** यामध्ये संदर्भ पुस्तके - २३ (रू. १३३१५), पाठ्यपुस्तके - १०० (रू. २१३३०) व शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता नियतकालिके - १६ (१२०००) खरेदी करण्यात आली. ई-नियतकालके, ई-बुक्स करिता (N-List Ahmadabad) ची वार्षिक वर्गणी रू. ५७५० इतकी भरलेली आहे.

३) **राबविले जाणारे उपक्रम-**

१. **दिनांक ९ ऑगस्ट २०१७:-** रोजी डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती साजरी करण्यात आली.

२. **दिनांक १२ ऑगस्ट २०१७:-** रोजी ग्रंथपाल दिवसाचे औचित्य साधून बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी वर्ष प्रथम चे विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची ओळख या विषयाला अनुसरून ग्रंथालयातील सेवा, सुविधा व योजना याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ई-संसाधनाचा वापर या विषयावर माहिती व प्रात्यक्षिकासह विद्यार्थी व प्राध्यपकांना मार्गदर्शन करण्यात आले.

३. **दिनांक १५ जानेवारी २०१८:-** रोजी औरंगाबाद विभाग ATS (दहशतवाद विरोधी पथक) यांचे प्रमुख श्री गणेश काळे यांनी दहशतवाद, वैशिष्ट्ये, कारणे व उपाय योजना या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## अभ्यासकेंद्र श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

**१) प्रवेशित विद्यार्थी संख्या:-**

| अ.क्र. | शिक्षणक्रम | कालावधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | पूर्वतयारी | जून-ऑगस्ट २०१७ | १२ |
| ०२ | बी. ए. प्रथम | जून २०१७ - मे २०१८ | १२१ |
| ०३ | बी. ए. द्वितीय | जून २०१७ - मे २०१८ | ८० |
| ०४ | बी. ए. तृतीय | जून २०१७ - मे २०१८ | ८२ |
| | | **एकूण** | **२९३** |

**२) उद्‌बोधन वर्ग:-** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना उद्‌बोधन करण्यासाठी दिनांक १४ जानेवारी २०१८ रोजी अभ्यासकेंद्राचे केंद्र संयोजक प्रा. रामकिशन लोमटे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले व्यासपीठावर अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थ्यांना केंद्र संयोजक प्रा. रामकिशन लोमटे यांनी वर्षभराच्या नियोजनाचे वेळापत्रक समजावून सांगितले. उद्‌बोधन वर्गासाठी बी. ए. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**३) समंत्रण:-** महाविद्यालयातील प्राध्यापक आपापल्या विषयाचे समंत्रक म्हणून कामकाज पूर्ण करत आहेत. याकरिता समंत्रकांना वेळापत्रकाची प्रत दिलेली आहे.

**४) वर्षभरामध्ये अभ्यासकेंद्रातील केलेली कामे:-**

१. दिनांक ०१ जून २०१७ पासून पूर्वतयारी व बी. ए. चे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने सुरू झाले. ऑनलाईन प्रवेश पद्धतीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.
२. डॉ. रामकिशन लोमटे यांनी अभ्यासकेंद्राचे २०१६-१७ या वर्षाचे ऑडीट करून घेतले.
३. दिनांक २ ते ४ डिसेंबर २०१७ दरम्यान पूर्वतयारी शिक्षणक्रमोच विद्यापीठाची परीक्षा औरंगाबाद येथील सेंटर व विद्यार्थ्यांनी परीक्ष दिली. त्यासंदर्भात विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यात आल्या व हॉलतिकीट डाऊनलोड करून वितरित केले.
४. मुक्त विद्यापीठाच्या मागीत वर्षीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश सुरू झाले असे सांगण्यासाठी मोबाईद्वारे संपर्क साधण्यात आला. तसेच प्रवेश अर्जांची एक प्रत स्वीकारण्यात आली.
५. पूर्वतयारी व बी. ए. या शिक्षणक्रमाचे निकाल घोषित झाल्यानंतर विभागीय केंद्रातून गुणपत्रिका आणल्या व गुणपत्रिकाची छाननी करून आणि वितरणास सुरूवात केली.
६. दिनांक १२ सप्टेंबर २०१७ रोजी विभागीय केंद्र औरंगाबाद येथे केंद्र संयोजक, समंत्रक यांचा प्रस्ताव सादर करण्यात आला. तसेच वेळापत्रक सादर करण्यात आले.
७. नोव्हेंबर / डिसेंबर २०१७ परीक्षेसाठी बी. ए. शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट वितरित केले.
८. मुक्त विद्यापीठाकडून पाठविण्यात आलेले शैक्षणिक अध्ययन साहित्य स्वीकारण्यात आले. तसेच अध्ययनार्थींना पुस्तकांचे वाटप करण्यात आले.
९. दिनांक २९ डिसेंबर २०१७ रोजी अभ्यासकेंद्रामार्फत एम. ए. व बी. कॉम या शिक्षणक्रमासाठी विद्यापीठास प्रस्ताव सादर करण्यात आला.
१०. दिनांक ३० जानेवारी २०१८ रोजी बी. ए. या शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राचे पुर्नमान्यतेचे प्रस्ताव विद्यपीठास सादर करण्यात आला.
११. विद्यार्थ्यांच्या विषय निवडीबाबत त्रुटी, विद्यापीठाची श्रेयांकतरची फीस भरण्याबाबतच्या त्रुटी आणि अभ्यासकेंद्राची फीस व फार्म न भरलेले विद्यार्थी यांच्याशी वेळोवेळी संपर्क केला.
१२. विद्यार्थ्यांना गृहपाठाचे प्रश्न देण्यात आले. तसेच त्यांच्याकडून गृहपाठ स्वीकारले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेले

## विविध उपक्रम तथा शिबिरे

### अर्थशास्त्र व वाणिज्य विभाग आयोजित

### राज्यस्तरीय कार्यशाळा - वस्तू व सेवा कर (दि. १५ फेब्रुवारी २०१८)

१) **नोंदणी:-** दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ ला सकाळी ९.०० वाजल्या पासून नोंदणी सुरू केली. या कार्यक्रमासाठी एकूण ८३ प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी यांनी नोंदणी केली.

२) **उद्घाटन सत्र:-** दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता महाराष्ट्र राज्य विधानसभेचे अध्यक्ष मा. हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत उद्घाटन सत्रास सुरूवात झाली. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद मधील विशेष कार्यासिन अधिकारी डॉ. वाल्मिक सरोदे, बिजभाषक श्री प्रसन्न दातार (सहाय्यक आयुक्त, जी.एस.टी), संस्थेचे सचिव, शामसुंदर नाईक, संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

३) **बीजभाषक:-** डॉ. प्रसन्न दातार (साहाय्यक आयुक्त, वस्तू व सेवाकर व कस्टम) यांनी ग्रामीण भागात जी.एस.टी. एक स्तूत्य उपक्रम आहे. यामुळे छोट्या उद्योजकांना, व्यापारांना व सर्वसामान्यांना ही संकल्पना समजण्यास मदत होईल. प्रत्यक्ष कराबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता आहे. परंतु भरणाऱ्यांचे प्रमाण फारच कमी आहे. अप्रत्यक्ष कर मात्र प्रत्येक नागरिक भरतो त्यामुळे त्याबद्दल जागरूकता होणे गरजेचे आहे. जगातील १६० देशात हा कर आहे. त्यामुळे या जगाशी सुसंगत असलेला जी.एस.टी. कर आपल्या देशात लागू होणे गरजेचे आहे. या पद्धतीने एक राष्ट्र एक कर एक बाजार अशी स्थिती निर्माण झाल्याने देशातील विदेशी गुंतवणूक वाढेल.

४) **अध्यक्षीय समारोप:-** उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप विधानसभेचे अध्यक्ष मा. हरिभाऊ बागडे (नाना) यांनी केला. २००२ पासून मा. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असल्यापासून या कराबद्दल प्रयत्न सुरू आहेत. संसदेच्या बहुतांश सदस्यांनी या कराला पाठींबा दिला. त्यामुळे एक देश एक कर हा लोकसभेत मंजूर झाला. या करामध्ये अनेक चांगल्या बाबी आहेत व काही त्रुटी असतील तर त्यात सुधारणा करता येते. त्या संदर्भात विविध स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. सुट्ट्या शेतमालाच्या विक्रीवर कर नसल्याने शेतकऱ्यांच्या फायद्याचे आहे. आगोदर ही वस्तूवर कर होता. परंतु तो सर्वसामान्यांना कळत नव्हता. आता मात्र जी. एस. टी. मुळे तो सर्वसामान्यांना कळेल. राष्ट्रविकासासाठी कराचा भरणा करणे गरजेचे आहे असे मत त्यांनी मांडले. या कराच्या महसुलातून सरकारला विविध कल्यानकारी योजना राबविणे शक्य होते.

५) **जी. एस. टी. व भारतीय अर्थव्यवस्था - सत्र दुसरे:-** या सत्रास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. करणसिंग राजपूत (लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळ) हे होते. सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रो. डॉ. सुनिल नरवडे (अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) होते तर सत्र समन्वयक म्हणून डॉ. राजेश लहाने यांनी केले. यावेळी डॉ. करणसिंग राजपूत यांनी जी.एस.टी. आपल्या देशात लागू होण्याची सर्व प्रक्रिया सांगितली. कराचे विविध दर सांगितले. या कराचे फायदे व तोटे सांगितले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. सुनिल नरवडे म्हणाले की, हा कर लागू झाल्याने अप्रत्यक्ष करांचा एकूण कर महसुलातील हिस्सा वाढेल. या बाबींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या सत्राचे सुत्रसंचलन प्रा. नितीन माळेगावकर यांनी केले तर आभार डॉ. महेश थोरात यांनी मानले.

६) **जी. एस. टी. तांत्रिक बाजू - सत्र तिसरे:-** या सत्रास प्रमुख वक्ते म्हणून श्री चेतन गुजराती (प्रमाणित लेखापाल), श्री आर. डी. जैस्वाल (प्रमाणित लेखापाल), श्री मंदार सर्वत्सर (संचालक, सीईओ टेन्को

सर्व्हिसेस) तर सत्र समन्वयक म्हणून डॉ. पुरूषोत्तम देशमुख यांनी केले. श्री चेतन गुजराती यांनी अप्रत्यक्ष कराची संकल्पना समजावून सांगीतली. जी.एस.टी. पूर्वी १७ पेक्षा अधिक कर होते, त्याचे एकत्रिकरण झाले. जी.एस.टी. हा उपभोग आधारीत कर आहे. अगोदरचा उगम आधारित होता. श्री आर. डी. जैस्वाल यांनी असे मत मांडले की सर्व निर्णय जी.एस.टी. कौन्सील ठरवणार आहे. त्यामध्ये सर्वांचे मत विचारात घेऊन (राज्ये व केंद्र सरकार) निर्णय घेतला जाणार असल्याने विचार करूनच बदल होतील. जी.एस.टी. नंबर १५ आकड्याचा असतो तेव्हा ग्राहकाने तो तपासून घ्यावा. तसेच तो ऑनलाईन सुद्धा तपासता येतो. त्यामुळे ग्राहकांनी जागरूक राहावे. श्री मंदार संवत्सर यांच्या मते मूळ कल्पना वेळी. एक देश एक करा ऐवजी आता एक देश तिन कर अशी रचना जी.एस.टी. मध्ये झालेली आहे. सध्या हा कर सुधारणेचा कालावधी आहे. भविष्यकाळात वास्तवात असलेली संकल्पना प्रत्यक्षात येईल. छोट्या उद्योगाला महिन्याला कर भरताना अडचणी येतात. सत्राचा अध्यक्षीय समारोप करातांना श्री रविंद्र काथार यांनी या कराच्या संदर्भातील सरकारी पत्रव्यवहार स्थानिक भाषेमध्ये व्हावा असे मत त्यांनी मांडले.

७) **समारोप सत्र:-** या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी डॉ. नंदकुमार राठी, वित्त व लेखाधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे होते. यावेळी ते म्हणाले की, जी.एस.टी. मुळे करामध्ये सोपेपणा आला आहे. आगोदरच्या करात करावर कर बसत असल्याने अंतिमत: अधिक कराचा दर बसत आहे. परंतु आता जी.एस.टी. मध्ये त्यापेक्षा कमी दराने कर बसतो. या प्रणालीत लेखापरीक्षकांच्या व्यवसायात वाढ झाली आहे. त्यामुळे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना चांगल संधी आहे. जी.एस.टी. मध्ये सुरवातीस ज्या दराने कर लावला होता त्या कराच्या दरात घट करण्यात आली आहे. जी.एस.टी. मध्ये टप्प्या टप्प्याने सुलभता येईल. आता मात्र ग्रामीण भागात पुरेशी संरचना नाही. या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी केला. त्यांच्या मध्ये सरकार आधारभूत संरचना वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत आहे. समाजातील लोकांनी आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याची मानसिकता ठेवली पाहिजे. कर पहिल्यांदा येत असल्याने तो किचकट वाटतो, परंतु आगोदर जे विविध कर होते त्यांचे कोठे समाजाला माहिती होते? परंतु आता अर्थव्यवस्था खूली करण्याचा प्रयत्न होत आहे. समाज हा नवीन बदलाला स्वीकारण्याच्या मानसिकतेत नसतो. सरकारचे मुख्य उद्दिष्ट हे सर्वसामान्य लोकांचे जीवन सुखद करायचे आहे. तसेच सुलभ ही झाले पाहिजे. जी.एस.टी. चा मुख्य उद्देश हा अर्थव्यवस्थेची सुलभता देणारा आहे असे मत त्यांनी मांडले. यावेळी कार्यशाळेबद्दल मनोगत डॉ. संजय मणर व डॉ. सत्यकुमार राठी यांनी मांडले. या सत्रास प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांची प्रमुख उपस्थिती होती. या समारोप सत्राचे सुत्रसंचलन डॉ. महेश थोरात यांनी केले तर आभार डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मानले. या राज्यस्तरीय कार्यशाळेची सांगता वंदे मातर्‌म ने झाली.

## सुशिक्षित बेरोजगार तरूणांसाठी रोजगार विषयक प्रशिक्षण शिबीर
## (दि. ५ व ६ ऑक्टोबर २०१७)

१) **प्रस्तावना:-** भारतीय तरूण हा सुशिक्षीत असूनही बेरोजगार आहे. तर दुसरीकडे उद्योग विश्व कुशल कामगार मिळत नसल्यामुळे हवालदिल झाले आहे. या विरोधाभासाचे कारण आहे की, उद्योग विश्वाला लागणारा कुशल मनुष्यबळ पुरवठा हा नेमका कोणत्या कौशल्याचा/कुशलतेचा लागतो, ही यथोचित/योग्य माहिती या सुशिक्षीत तरूणांना नसल्यामुळे ते उद्योग विश्वाला असणारी कौशल्याची गरज पूर्ण करू शकत नाहीत. हाच धागा धरून भारताचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांनी कौशल्य विकास हा कार्यक्रम देश पातळीवर हाती घेतला आहे. त्याच अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय यांच्या

संयुक्त विद्यमाने सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार विषयक प्रशिक्षण शिबीर दिनांक ५ ते ६ ऑक्टोबर २०१७ या दरम्यान महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे आयोजित करण्यात आले होते.

२) **उद्‌घाटन समारंभ:-** दिनांक ५ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ११.०० वा. महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. शिबिराचे उद्‌घाटक म्हणून डॉ. कैलास पाथ्रीकर (संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) तर अध्यक्ष म्हणून संस्थचे सचिव श्री शामसुंदर नाईक हे होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे माजी प्रकल्प अधिकारी डॉ. सरदारसिंग बैनाडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे प्रामुख्याने उपस्थित होते. या शिबिराचे प्रास्ताविक वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. महेश थोरात यांनी केले. यात त्यांनी महाविद्यालयात अशा विद्यार्थी केंद्रित उपक्रमाची गरज व भूमिका समजावून सांगत विद्यार्थ्यांनी स्वत:ला रोजगारक्षम बनवणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. उद्‌घाटक म्हणून उपस्थित डॉ. कैलास पाथ्रीकर यांनी उद्‌घाटनपर भाषण केले. सध्याचा काळ स्पर्धेचा आहे. सरकारी नोकऱ्यांच्या मागे धावता धावता उद्योग व्यवसायातील रोजगारांच्या संधीकडे दुर्लक्ष होतेच तरूणांनी त्यावर देखील लक्ष केंद्रित करावे. डॉ. सरदारसिंग बैनाडे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, शिक्षण हे फक्त पुस्तकात व अभ्यासक्रमात नसून दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्यांवर मात करून विजय मिळवून देणारे ज्ञान हेच खरे शिक्षण आहे व तोच तरूण असतो जो तरून जातो. उद्योग व्यवसायात यश मिळवायचे असेल तर पुस्तकाच्या बाहेरचे पण ज्ञान महत्त्वाचे आहे. या सत्राचे बीजभाषक म्हणून श्री राजेश चंचलानी (संचालक, सी.बी.एफ.सी. लिमिटेड, औरंगाबाद) हे होते. ते रोजगार विषयक संधी व आव्हान या विषयावर बोलताना म्हणाले की, जीवनातील विविध अनुभवच आपल्याला आपले पाय मजबुत करण्याची शक्ती देत असतात. तेच अनुभव आपल्याला दिशा दाखवितात. रोजगाराच्या संधी विविध क्षेत्रात आहेत त्या सर्व त्यांनी सांगितल्या. तसेच ते म्हणाले की, जो आव्हाने स्वीकारून दीर्घकाळ टिकून राहतो तो नक्कीच यशस्वी होतो. उद्‌घाटन समारंभाचे अध्यक्ष श्री शामसुंदर नाईक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करतांना सांगितले की, आपल्या क्षेत्रात सुरूवातीपासूनच अंगावर पडलेली प्रत्येक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्याची सवय लागल्यास वागणुकीतून यशस्वी होणे सोपे आहे. असे त्यांनी सांगून ६०-७० च्या दशकातील शिक्षणावर प्रकाश टाकला व आज त्यापेक्षा जास्त साधने उपलब्ध आहेत. त्याचा फायदा घेण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री लक्ष्मीकांत ढेपले यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नितीन माळेगावकर यांनी केले.

३) **सत्र दुसरे:-** NAK उद्योग समुहाचे व्यवस्थापकीय संचालक व प्रसिद्ध उद्योजक श्री दिलीप धारूरकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून तर वाणिज्य विषयाचे प्रा. नितीन माळेगावकर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी कौशल्य विकास या विषयावर मार्गदर्शनपर भाषणात बोलताना श्री दिलीप धारूरकर म्हणाले की, औरंगाबाद परिक्षेत्रातील मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उद्योग असल्यामुळे परिसरातील तरूणांना कौशल्याच्या आधारे उद्योग व्यवसायात रोजगाराच्या भरपूर संधी आहे. त्यांनी याप्रसंगी उदाहरणे देवून विविध कौशल्ये कशी आत्मसात करायची किंवा विकसित करायची व त्या आधारे कशा प्रकारे आपण रोजगार किंवा स्वंयरोजगार मिळवू शकतो हे देखील सांगितले. प्रसंगी त्यांनी समुहाने आल्यास आवश्यकतेनुसार मदत करण्याचे आश्वासन देखील दिले. या सत्राच्या अध्यक्षीय समारोपात प्रा. नितीन माळेगावकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास व शिक्षण करत असतांनाच आपण आपले ध्येय निश्चित करावे व त्या दृष्टीने त्या क्षेत्राचे आपले अवांतर ज्ञान संपादन करावे असे सांगून भारतीय उद्योग क्षेत्र तरूणांना जागतिक बाजारपेठेत जाण्याची संधी देते त्यासाठी online e-commerce यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

४) **दिनांक ६ ऑक्टोबर २०१७:-** शिबिराच्या तिसऱ्या सत्रासाठी उद्योजकता विकासात शासनाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी पूणे येथील वाडिया कॉलेज येथील व्यवस्थापन शाखेचे प्राध्यापक डॉ. दिपक वायाळ हे उपस्थित राहिले. तर अध्यक्ष म्हणून प्रस्तुत महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर हे होते. डॉ. दिपक वायाळ यांनी उद्योजकता विकासात शासनाची भूमिका या विषयावर बोलताना म्हणाले की, सध्याच्या केंद्र सरकार व राज्य सरकारने विविध प्रकारच्या योजनांमधून तरूणांसाठी रोजगाराच्या विपूल संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांनी शासनाच्या Skill India, Make in India, Startup India, Standup India, मुद्रालोन या सर्वांच्या विस्तृत विवेचनानंतर त्यामध्ये असलेल्या संधी सांगून विद्यार्थ्यांना उद्योगधंदे, व्यवसाय करण्यासाठी प्रेरणा दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, भारतीय अर्थव्यवस्था ही इतर देशांच्या तुलनेत कशी जास्तीत जास्त संधी देणारी आहे तसेच भारतीय कर रचना व नोटबंदी या सर्व बाबींवर प्रकाश टाकत त्यांनी विद्यार्थ्यांना एकाच वेळी विविध प्रकारच्या उद्योगात गुंतवणूक केल्यास अपयश येण्याचा धोका कमी होतो असे सांगीतले.

५) **समारोप:-** दोन दिवशीय शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे व प्रमुख मार्गदर्शक म्हणून अजित सिड्सचे व्यवस्थापक श्री शिवाजीराव अंभोरे तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. समारोप प्रसंगी कृषी आधारित व्यवसायातील रोजगार विषयक संधी या विषयावर मार्गदर्शन करताना श्री शिवाजीराव अंभोरे म्हणाले की, शेती क्षेत्रच आज आपल्याला तारू शकते. तरूणांनी शेतीकडे पाठ न फिरविता आधुनिक शेतीची कास धरावी व त्यावर आधारित इतर व्यवसायांची शेतीला जोड द्यावी म्हणजे शेतीतून आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत वाढतील व शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ येणार नाही, तर याउलट शेतकरी रोजगार देणारा होईल असे प्रतिपादन त्यांनी केले. अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी कष्टाला आयुष्यात पर्याय नाही. आजकालच्या विद्यार्थ्यांनी शॉर्टकटच्या मागे न पळता मेहनत करा. कोणतेही काम अभ्यास करून करण्याची हिम्मत ठेवण्याचा सल्ला देऊन यश तुमचेच आहे असे मत व्यक्त केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागाचे सर्व विद्यार्थी, प्रा. नितीन माळेगावकर व विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात यांनी परिश्रम घेतले. प्रसिद्धी प्रमुख म्हणून मराठीचे प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी भूमिका पार पाडली.

## महात्मा गांधी व्याख्यानमाला (दि. ११ जानेवारी २०१८)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, विद्यार्थी विकास विभाग व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ जानेवारी २०१८ रोजी महात्मा गांधी व्याख्यानमाला संपन्न झाली. व्याख्यानमालेचे उद्घाटन व बीजभाषक म्हणून ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत श्री ज्ञानप्रकाश मोदानी उपस्थित होते. वक्ते म्हणून लोकसेवा महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनिल पिंपळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. या व्याख्यानमालेचे उद्घाटन सकाळी ११.३० वाजता ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत श्री ज्ञानप्रकाश मोदानी यांच्या हस्त झाले. उद्घाटन समारंभाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील कु. मृणाली मनोरकर आणि कु. अंकिता गायके या वाणिज्य विभागाच्या विद्यार्थीनींनी गांधीजीची प्रार्थना सादर केली. सुदर्शन वहाटुळे या विद्यार्थ्याने सुविचार व कु. निशा पांचाळ या बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थीनीने अमृतवचन सांगितले. अतिथीचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केले. या व्याख्यानमालेचे समन्वयक प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

गांधीवादी विचारवंत श्री ज्ञानप्रकाश मोदानी यांनी महात्मा गांधीच्या विचारांची आजच्या काळातील प्रासंगिकता या विषयावर बीजभाषण केले. श्री ज्ञानप्रकाश मोदानी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले की, महात्मा गांधी जीवन कार्यातून आपल्याला प्रेरणा घेण्यासारखे खूप आहे. गांधीजींच्या विचारांचा आदर्श समोर ठेवल्यास आनंद मिळतो. प्रारंभी त्यांनी विद्यार्थ्यांच्या समोर काही प्रश्न उपस्थित केले. प्रत्येक मानुस कशासाठी धावपळ करतो? मानसाच्या जगण्याचे ध्येय काय? मानसाची सर्व धडपड सुखासाठी चाललेली आहे. सुख प्राप्ती हे जगण्याचे अंतिम ध्येय असते. परंतु मानवाने सुखाच्या शोधात समस्यांचा डोंगर उभा केला आहे. पाश्चिमात्य चंगळवादी जीवनपद्धतीमुळे मानसांची हाव वाढलेली आहे. आज मानवी मुल्यांचा ऱ्हास होत आहे. पर्यावरणाचे खुप मोठे नुकसान झालेले आहे. दारिद्र्य, बेरोजगारी, दहशतवाद, कुपोषण, महिलांवरील अत्याचार, बालमृत्यू, रोगराई, जलप्रदूषण, हिंसाचार, गुंडागिरी, अज्ञान, व्यसनाधिनता, देहव्यापार, आर्थिक विषमता, दुष्काळ, शेतकरी आत्महत्या इत्यादी प्रश्न आज तीव्र बनलेले आहेत. रस्ते  अपघात, अनारोग्य, लिंगचाचणी परीक्षण, हुंडापद्धती, अंधश्रद्धा, समस्या यामागची कारणे शोधने आवश्यक आहे असे महात्मा गांधीनी यांनी म्हटले होते. पृथ्वी सर्व मानवांच्या गरजा पूर्ण करू शकते पण एकाही मानवाची हाव दूर करू शकत नाही.

या समस्या टाळण्यासाठी महात्मा गांधीच्या विचारानूसार समाजाची वाटचाल होणे गरजेचे आहे. महात्मा गांधीनी आधुनिकतेच्या नावाखाली मानवाची विनाशाकडे वाटचाल सुरू आहे याकडे लक्ष वेधले होते. गांधीजींच्या विचारात अनेक प्रश्नांचे उत्तर सापडते, असे मोदाणी म्हणाले. गांधीजीचा विचार हा जीवनाचा एक मार्ग आहे. त्या मार्गाने जगण्याने जीवनात आनंद मिळतो. आज जगण्याची साधने उपलब्ध आहेत. पण मानुस आनंद हरवून बसला आहे. गांधीजींच्या विचाराने आजची अनेक प्रश्न सोडविणे शक्य आहे. गांधीजींच्या विचाराने जीवनाची वाटचाल केल्यास आनंद मिळतो, असे मत ज्ञानप्रकाश मोदाणी यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थिती व वक्ते म्हणून लाभलेले डॉ. सुनिल पिंपळे यांनी महात्मा गांधीच्या विचारावर प्रकाश टाकला. महात्मा गांधीजीचे विचार हे आपल्या जीवनात उपयुक्त आहेत. गांधी विचार हे केवळ सांगण्यासाठी व ऐकण्यासाठी नसून कृतीत आणण्यासाठी आहेत. गांधीजींचे विचार कृतीत आणणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारानुसार वागल्यास, मानवाला अनेक फायदे होतील. पर्यावरण प्रदुषणाची गंभीर समस्या सोडविणे शक्य होईल. गांधीविचार प्रत्यक्षात किती प्रमाणात अंगीकृत केले जातात या विषयी साशंकता आहे. आजच्या काळात गांधीजींचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत असे मत डॉ. सुनिल पिंपळे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला. ते म्हणाले की नवीन पिढीला गांधीजींच्या विचारांचे ज्ञान व्हावे यासाठी महाविद्यालयाने महात्मा गांधी व्याख्यानमाला आयोजित केलेली आहे. आपल्या समोर विचारवंताच्या विचारांचे आदर्श असले पाहिजेत, जीवनात आपल्याला ते मार्गदर्शक ठरू शकतात. गांधीजींचे विचार आपल्या जीवनात अनुकरणीय आहेत. महात्मा गांधीची वाणी आणि कृती एकच होती. या व्याख्यानमालेतून विद्यार्थ्यांना ऐकायला मिळालेले विचार आपल्या जीवनात निश्चित उपयुक्त ठरतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाच्या कु. मंगल सुरभैय या विद्यार्थीनीने आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. बाबासाहेब लहाने यांनी केले. व्याख्यानमालेची सांगता वंदेमातरम् या गिताने झाली.

## क्रीडा व ग्रंथालय - राष्ट्रीय परिषद (दि. २३ फेब्रुवारी २०१८)

क्रीडा व ग्रंथालय विभागामार्फत दिनांक २४ फेब्रुवारी २०१८ रोजी एक दिवसाची राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. यामध्ये २६० संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आली.

१) **उद्घाटन समारंभ:-** या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मा. हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बिजभाषक डॉ. एस. एस. सिंग हे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री शामसुंदर नाईक, पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे, डॉ. कल्पना झरीकर, डॉ. दिपक कापडे, डॉ. शणुंजय कोटे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले तर आभार डॉ. संदीप जगताप यांनी मानले.

२) **प्रथम सत्र:-** या परिषदेसाठी क्रीडा विभागाचे १२० प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. बिजभाषक म्हणून डॉ. एस. एन. सिंग यांनी स्पोर्ट्स सायन्स् (sports science) या विषयावर प्रकाश टाकला. या सत्रामध्ये संशोधकांनी तीन हॉलमध्ये ६० पेपरचे वाचन करण्यात आले. तर ग्रंथालय शास्त्र यासाठी चार हॉलमध्ये ८० संशोधकांनी आपल्या संशोधन पेपरीच मांडणी केली.

३) **द्वितीय सत्र:-** या सत्रामध्ये बिजभाषक म्हणून पुणे विद्यापीठाच्या डॉ. सुरेखा दप्तरे यांनी क्रीडा मानसशास्त्र या विषयावर प्रकाश टाकला. या सत्रामध्ये चार हॉल ६० संशोधन पेपरचे वाचन करण्यात आले. तर ग्रंथालय शास्त्राचे चार हॉल ८० संशोधन पेपरचे वाचन करण्यात आले.

४) **समारोप कार्यक्रम:-** समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे हे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा बोर्डाचे सदस्य डॉ. गोविंद कदम, डॉ. बप्पासाहेब म्हस्के, डॉ. नेताजी मुळे, पुणे विद्यापीठाच्या डॉ. सुरेखा दप्तरे, डॉ. मिना पवार, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे डॉ. लिंबाजी प्रताळे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले आदींचे उपस्थिती होती. याप्रसंगी उत्कृष्ठ संशोधक पुरस्कार डॉ. हेमंत वर्मा, डॉ. मीना पवार, डॉ. सचिन देशमुख यांना देण्यात आला.

## राष्ट्रीय सेवा योजना - विशेष शिबीर (दि. २० ते २६ डिसेंबर २०१७)

१) **आगमण:-** शिबीर पूर्ण सात दिवसाचे होण्यासाठी एक दिवस आगोदर म्हणजे दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी दरेगाव (दरी) गावात स्वयंसेवक मुक्कामी गेले व दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमासाठी आवश्यक सर्व सुविधांचे व्यवस्थापन केले.

२) **उद्घाटन:-** दिनांक २० डिसेंबर २०१७ रोजी सकाळी ९.३० वा. शिबिराचे उद्घाटन ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. टी. आर. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळेस त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनचे महत्त्व उपस्थितांना पटवून सांगितले व राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून एक शुभ कार्याने विद्यार्थ्यांच्या सामाजिक जीवनाची सुरूवात होते. चांगच्या संस्काराची आणि जीवनमुल्यांची प्रेरणा होते असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून दरेगाव दरी येथील सरपंच सौ. शोभाताई बाजीराव मालोदे उपस्थित होत्या. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड येथील प्राचार्य डॉ. एस. टी. सांगळे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात गावकऱ्यांकडून विद्यार्थ्यांना सात दिवसीय शिबिरासाठी त्याच्या सहभागाची अपेक्षा केली. तसे शाश्वत शेती व गावाचा विकास करावयाचा असेल तर गावाने एकत्र येऊन कामे केली पाहिजे व मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी ध्यास धरला पाहिजे. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, उपप्राचार्य डॉ. कल्याणकर पी. एम. व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे

प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी केले. उद्घाटन प्रसंगी ग्रामस्थ तसेच महिला वर्ग उपस्थित होता. उपस्थितांचे आभार प्रा. संजीवकुमार पांचाळ यांनी मानले.

३) **योग-प्राणायाम व शारीरिक कसतरती:-** शिबिरात दररोज सकाळी योग-प्राणायाम व शारीरिक कसरती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यात महाविद्यालयातील कार्यक्रमाधिकारी व एन.एस.एस. प्रतिनिधी यांनी पहाटे ६.०० ते ७.०० या वेळेत योग, सुर्यनमस्कार, विविध आसणे जसे सर्वागासन, चक्रासन, वज्रासन इत्यादी प्रकार शिकविले.

४) **शिबिरातील नाविन्यपूर्ण उपक्रम**

१. **हगणदारी मुक्तीसाठी गांधीगीरी:-** शिबिराचे ब्रिदवाक्य स्वच्छतेसाठी युवा असल्याकारणास्तव गावकऱ्यांना उघड्यावर शौचालयाला प्रतिबंध करण्यात आला व उघड्यावर शौचाला जाणाऱ्या गांधीगीरीच्या माध्यमातून लोकांचे मन परिवर्तन करण्याचा प्रयत्न प्रयत्न केला. तसेच उघड्यावर संडासाला बसणाऱ्यांना प्रतिबंधक घालण्यासाठी स्वयंसेवकांनी दररोज सकाळी ५ ते ५.४५ या वेळेस अशा ठिकाणी जाऊन ढोल वाजवून स्वागत करून उघड्यावर शोच करणाऱ्या व्यक्तीला मनाई करून त्याचे फुल देऊन स्वागत केले.

२. **जनजागृतीसाठी प्रभात फेरी:-** लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटावे व जास्तीत जास्त गावकऱ्यांनी शौचालयाचा वापर करावा या उद्देशाने गावात स्वयंसेवकांनी प्रभात फेरी काढली व किती ग्रामस्थ शौचालयाचा वापर करतात याबद्दल माहिती गोळा करण्यात आली. साधारणत: किती शौचालयाची आवश्यकता आहे हे निरीक्षणावरून ठरविण्यात आले.

३. **भजन किर्तनातून स्वच्छतेचा संदेश:-** गावातील लोकांना उघड्यावर संडासला बसू नये यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी गावातील सर्व लोकांना विठ्ठल रूख्मीनी समाज मंदिरासमोर भजन करून स्वच्छतेचा संदेश आपल्या भजनातून दिला व प्रत्येक घरी जाऊन लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले.

५) **श्रमदान:-** शिबिरात दरारोज सकाळी ८.०० ते १२.३० या वेळेत श्रमदान घेण्यात आले. यात पुढील कामे करण्यात आली.

१. **गावाची व सार्वजनिक ठिकानांची सफाई:-** शिबिराच्या पहिल्या व उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी स्वंयसेवकांनी गावातील सार्वजनिक ठिकानावरील व निवासाच्या ठिकानाची साफ सफाई केली. समाज मंदिराभोवतालचा परिसर स्वच्छ केला. गावातील सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यलये व शाळेचा आजुबाजुचा परिसर स्वच्छ केला व रस्त्याच्या आजुबाजुला जमा झालेला कचरा गोळा करून त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावण्यात आली.

२. **नादुरूस्त नाल्यातील गाळ व कचरा साफ-सफाई:-** सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ओपन ड्रेनेज लाईन आहे. परंतु सततच्या वापरामुळे त्यात केरकचरा जाऊन बंद झाल्यामुळे सांडपाणी रस्त्यावरून वाहत असे. नादुरूस्त नाला दुरूस्त करून त्यातील केरकचरा स्वंयसेवकांनी साफ केला.

३. **स्मशानभूमीसाठी रस्ता:-** मौजे दरेगाव दरी येथे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या शिबिराच्या संदर्भात दिनांक १२ डिसेंबर २०१७ रोजी घेतल्या गेलेल्या शिबिरपूर्व गावभेटीत म्हणजेच ग्रामस्थांसोबतच्या बैठकीत सर्व ग्रामस्थांच्या विचारविनिमयानुसार ठरल्याप्रमाणे व गत वर्षाच्या शिबिरातील श्रमदानातून हागणदारीचा प्रश्न आता पूर्णपणे मिटलेला आहे म्हणून चालु वर्षी रासेयोने गावासाठी स्मशानभुमीला जाणारा रस्ता तयार करून द्यायचा आहे, करिता महाविद्यालयाने ठरल्याप्रमाणे शिबिरात उद्घाटनानंतर दररोज सकाळी ८.०० ते १२.३० या वेळेत श्रमदान करून उद्घाटननंतर शिबिराच्या दुसऱ्या दिवशी करावयाचा सर्व रस्ता आखुन घेतला व पुर्ण रस्त्याच्या दोन्ही बाजुने मूरूम खोदून रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या कडा तयार करून घेतल्या. शिबिराच्या तिसऱ्या दिवशी

अर्ध्या रस्त्यावर मुरूम अंथरण्यात आला. शिबिराच्या चौथ्या दिवशी राहिलेल्या अर्ध्या रस्त्यावर मुरूम अंथरण्यात आला. त्यामुळे थोडासा पातळ परंतु पुर्ण रस्ता तयार झाला. शिबिराच्या पाचव्या दिवशी पुर्ण रस्त्यावर परत एकदा मुरूम अंथरूण जाडजूड रस्ता तयार करण्यात आला, व स्मशानभुमीतील वाढलेले गवत व झूडूपे काढून तयार केलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजुने वृक्षारोपनासाठी खड्डे खोदण्यात आले. शिबिराच्या सहाव्या दिवशी पूर्ण गावातील रस्ते झाडून स्वच्छ करण्यात आले. नाल्यांमधला गाळ, कचरा व घाण काढून सांडपाणी वाहून जाण्यासाठी नाल्या मोकळ्या करण्यात आल्या. तसेच गावातील मोकळ्या जागेवर जमा झालेले गवत, काडी कचरा पुर्णपणे साफ केला गेला. शिबिराच्या सातव्या दिवशी गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या व शिबिराचा मुक्काम ज्या ठिकाणी आहे त्या विठ्ठल रूख्मिणी मंदिराच्या बाजुला एक मोठ्या पडक्या वाड्याच्या विस्तीर्ण अशा मोकळ्या जागेचा भविष्यात गावातील लग्न कार्य, समारंभ, किर्तन किंवा एखादा सामुहिक सार्वजनिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी वापर व्हावा या दृष्टिने त्या वाड्याच्या भिंती पाडून ती जागा एक समान करण्यात आली.

६) **बौद्धिक सत्र:-** विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांचा विकास व्हावा व विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व बहरावे या कल्पनेतून विद्यार्थीमुख बौद्धिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात दररोज दुपारी ३ ते ४.३० या वेळेत बौद्धिक सत्र ठेवण्यात आले होते.

१. **दिनांक २१ डिसेंबर २०१७:-** रोजी बौद्धिक सत्रात राजकारणातील युवकांची भुमिका या विषयावर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. संदीप जगताप यांनी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२. **दिनांक २२ डिसेंबर २०१७:-** रोजी च्या बौद्धिक सत्राचा विषय हा आनंद हा यशस्वी जीवनाची सुत्रे हा होता. या विषयावर श्री कचरू गरसोळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. संदीप जगताप व महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात यांनी देखील उपस्थितांना या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. विजय पांडे यांची उपस्थिती होती. त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

३. **दिनांक २३ डिसेंबर २०१७:-** रोजी मन व भारतीय संत या विषयावर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. राजश्री पवार यांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा. नितीन माळेगावकर यांनी देखील उपस्थितींना या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे हिंदी विभागाचे प्राध्यापक डॉ. सुरेश मुंढे यांची उपस्थिती होती. त्यांनीही आपल्या अध्यक्षीय समारोपात उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

४. **दिनांक २४ डिसेंबर २०१७:-** या रासेयोतुन व्यक्तिमत्व विकास या विषयावर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक श्री बाबासाहेब लहाने यांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे वाणिज्य विभागचे प्राध्यापक प्रा. नितीन माळेगावर यांची उपस्थिती होती. त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

५. **दिनांक २५ डिसेंबर २०१७:-** रासेयोच्या माजी स्वयंसेवकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी उपस्थित सर्व माजी स्वयंसेवकांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी ही स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील डॉ. मंजुषा नळगीरकर यांची उपस्थिती होती. त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात उपस्थित स्वंयसेवकांना मार्गदर्शन केले.

**७) व्याख्यान सत्र:-** शिबिरात सायंकाळी ७ ते ९ यावेळेत व्याख्यान सत्र ठेवण्यात आले होते. यामाध्यमातून ग्रामस्थांना व स्वयंसेवकांना ग्रामीण जीवनाशी निगडीत विविध विषयावर समाजातील तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शनपर विचार एकण्याची संधी निर्माण करण्यात आली.

१. **पशुधनाची निगा:-** दिनांक २० डिसेंबर २०१७ रोजी फुलंब्री येथील पशुधन विकास अधिकारी, श्री बी. जी. तुपकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री बी. जी. तुपकर यांनी त्यांच्या पशुधनाची निगा या विषयावरच्या व्याख्यानात पशुधनावर पडणारे विविध आजार त्यांचा योग्य आहार, त्यांचे प्रजनन, प्रजनन काळात घ्यावयाची काळजी, त्यांच्यासाठी पशुधनाच्या आरोग्य केंद्रात उपलब्ध सोयी सुविधा, पशुधनावर केले जाणारे विविध उपचार या सर्व मुद्यांवर प्रकाश टाकत शेतऱ्यांच्या विविध शंकाकूशंकांचे समाधान केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात यांची उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात शेतकऱ्यांना पैसा हाताशी बाळगून ठेवण्याचा सल्ला दिला. तसेच उधारी बी-बीयाणे व खते खरेदी केल्यास व्यापारी वर्ग कशाप्रकारे शेतकऱ्यांना लुटतात हे सांगून पुढील वर्षीच्या बी-बीयाणांची, खतांसाठी पैशाची तजवीज अगोदरच करून ठेवावी. तसेच मुलांना कामाची व अभ्यासाची सवय लावाली व शेतकऱ्यांनी पिकांची निवड ही विचारपूर्वक करावी असेही सांगितले.

२. **रेशीम उद्योग:-** दिनांक २१ डिसेंबर २०१७ रोजी सायंकाळच्या व्याख्यान सत्रात डोंगरगाव (कवाड) येथील प्रगतीशील रेशीम उद्योग शेतकरी श्री आबासाहेब डकले यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होत. त्यांनी त्यांच्या व्याख्यानात रेशीम उद्योगातील सर्व बारकावे. त्याच्या तांत्रिक बाबी, कच्च्या मालाचा भाव, कच्या माल मिळण्याचे ठिकाण, रेशीम उद्योग टाकण्यासाठी लागणारी जागा, तिचे आकारमान, त्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ, रेशीमच्या आळयांचे खाद्य, त्यांचे आजार, त्यांचा कालावधी, रेशीम कोष काढूण घ्यायची प्रक्रिया, कोष कोठे विकायचे ती बाजारपेठ तसेच शासनाचे अनुदान, त्याचा कालावधी या सर्व बाबींना विस्तृतपणे समाजवून सांगीतले, तर जर एखादा शेतकरी रेशीम शेती उद्योग करणार असल्यास सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक व उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रेशीम उद्योगात जगातील भारताचा क्रमांक व भारतात देखील महाराष्ट्राचा कितवा क्रमांक लागतो हे सांगूण सांख्यिकीच्या आधाराने रेशीम उद्योग शेतकऱ्यांना आर्थिक विवंचनेतून बाहेर काढू शकतो हे पटवून सांगितले.

३. **सर्वांगिण ग्रामीण विकास:-** दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी ग्रामीण विकासावर एन. जी. ओ. च्या माध्यमातून उल्लेखनिय कार्य केलेल्या डॉ. सुहास आजगावकर यांचे सर्वांगिण ग्रामविकास या विषयावर आयोजन करण्यात आले होते. डॉ. आजगावकर यांनी ग्राम विकसित करण्यासाठी सर्व गावकऱ्यांनी मिळून झटले पाहिजे हे सांगून गावासाठी शासनाच्या व एन. जी. ओ. च्या विविध योजना समजावून सांगीतल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख व एक आधुनिक शेतकरी असलेले डॉ. दत्तात्रय येडले हे उपस्थित होते. त्यांनी देखील ग्रामीण विकासाच्या योजनांसोबतच शेतीसाठी कृषी विभागाच्या व महाराष्ट्र शासनाच्या योजना तसेच विविध बँकाच्या शेती व शेतकरी यांच्यासाठीच्या विविध कर्ज योजना व त्यांना लागणाऱ्या आवश्यक बाबी त्यांनी उपस्थित ग्रामस्थांना आपल्या अध्यक्षीय भाषणात समजावून सांगितल्या.

४. **महिला सबलीकरण:-** दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी प्रस्तुत महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजश्री पवार यांचे महिला सबलीकरण या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. पवार यांनी उपस्थित ग्रामस्थांना उद्देशून सांगितले की, घरातील मुलींना ही

मुलांप्रमाणेच समान वागणूक दिली पाहिजे. मुल या अबाल नसून पुरूषांपेक्षाही जास्त कणखर व समर्थशाली असतात. महिलांनी कुठेही स्वत:ला कमी लेखले नाही पाहिजे. या कार्यक्रमाला प्रस्तुत महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्राध्यापक व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. संजीवकुमार पांचाळ हे अध्यक्ष म्हणून लाभले. त्यांनी देखील प्राचीन काळातील विख्यात स्त्रियांचे दाखले देऊन स्त्री ही सबलाच हो असे सांगितले. त्यांनी संत वचनांच्या आधारे स्त्री ला पुरूषाप्रमाणेच एक अधिकार व न्याय मिळाला पाहिजे हे पटवून दिले.

५. **बंदिस्त शेळी पालन:-** दिनांक २४ डिसेंबर २०१७ रोजी पाल येथे बंदिस्त शेळी पालनाचा व्यवसाय करणारे श्री रवि राजपूत यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना आपल्या भाषणात बंदिस्त शेळीपालन व खुल शेळी पालन या दोन्हीही प्रकारात फायदे, तोटे, निगा, संधी, धोक, बाजारपेठ, उत्पन्न, खर्च, अनुदान योजना  या सर्वंच बाबी बारकाव्यांसह श्री बाजीराव मालोदे उपस्थित होते.

६. **महिला आरोग्य:-** दिनांक २४ डिसेंबर २०१७ रोजी श्री रवि राजपूत यांच्या व्याख्यानानंतर प्रस्तुत महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांचे महिला आरोग्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. गावातील सर्व महिलांना आगोदरच व्याख्यानाची कल्पना देण्यात आली होती. श्री राजपूत यांनी व्याख्यान झाल्यानंतर लगेचच मंदिराच्या प्रशस्त हॉलमध्ये सर्व महिलांना व मुलींना एकत्र बसवून महिलांचे खाजगी आरोग्य व स्वत:ची निगा या विषयावर विस्तृत असे मार्गदर्शन प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले.

७. **लोकसहभागातून ग्रामीण विकास:-** दिनांक २५ डिसेंबर २०१७ लोक सहभागातून ग्रामीण विकास याविषयावर विधानसभा अध्यक्ष मा. ना. हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी त्यांच्या खुमासदार शैलीत ग्रामविकास करतांना समाज एकत्र नाही आला तर कशी फसगत होते हे सांगितले. यावेळी फुलंब्री शहराचे पहिले नगराध्यक्ष श्री सुहासभाऊ शिरसाठ व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले उपस्थित होते. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी केले.

८) **सांस्कृतिक कार्यक्रम:-** गावकऱ्यांचे मनोरंजनातून उद्‌बोधन व्हावे या दृष्टिने शिबिरात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ९.३० ते १०.३० करण्यात आले.

१. दिनांक २० डिसेंबर २०१७ रोजी गावकऱ्यांचा व शिबिरार्थींचा संवाद घडवून आणला.
२. दिनांक २१ डिसेंबर २०१७ रोजी जि. प. प्रा. शाळा दरेगाव येथील लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.
३. दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी महाविद्यालयीन स्वयंसेवकांनी प्रबोधनपर नाटीका सादर केली.
४. दिनांक २४ डिसेंबर २०१७ रोजी श्री बी. एस. पुजारी यांच्या गणेश कला मंच तर्फे १.० तासाचा भारूड या कला प्रकारातुन समाज प्रबोधन हा सांस्कृतिक कार्यक्रमाच सादरीकरण करण्यात आले, यात महाविद्यालयाचा श्री ऋषिकेष पंडित याने तबला वादक म्हणून भूमिका पार पाडली.

९) **शिबीर समारोप:-** दिनांक २६ डिसेंबर २०१७ रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत शिबिराचा समारोप झाला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. संजय सांभाळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या या शिबिरामधून युवकांना आपल्या सुप्त गुणांची ओळख होते. यातुनच पुढे जाऊन त्यांना आपल्या भवितव्याची दिशा निश्चित करण्यात मदत होते. या समारोप समारंभास उपस्थित दुसरे प्रमुख पाहुणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी व विद्यापीठातील वाणिज्य विभागाचे प्राध्यापक डॉ. विलास इप्पर

हे होते. डॉ. विलास इप्पर हे आपल्या भाषणात म्हणाले की, भारतीय संस्कृती ही संत परंपरेने नटलेली असून ग्रामीण व्यवस्था समर्थ करण्याचे काम संत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेने केले असे सांगून त्यांनी ग्रामगीतेमधील खुप संदर्भ दिले व त्यांची शिकवण सर्वांनी आपल्या जीवनात अंकारण्याचा सल्ला दिला. याप्रसंगी रासेयोचे गट समन्वयक डॉ. डी. एफ. पार्थीकर यांनी देखील उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले.

## समाजशास्त्र राष्ट्रीय परिषद

**जागतिकीकरण आणि भारतातील ग्रामीण स्थित्यंतरे (दि. २८ फेब्रुवारी २०१८)**

**(Globalization and Rural Transforamtion in India)**

जागतिकीकरण आणि ग्रामीण स्थित्यंतरे या विषयावर महाविद्यालयामध्ये दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी एक दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. सदरील परिषदेत ६७ प्राध्यापक संशोधकांनी सहभाग घेतला.

१) **उद्घाटन सत्र:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयील समाजशास्त्र विभाग प्रायोजित ग्लोबलायझेशन ॲण्ड रूरल ट्रान्सफॉर्मिशन इन इंडिया या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. मनोज कुमार जेना (सहयोगी प्राध्यापक, सामाजिक व्यवस्था अभ्यासकेंद्र, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली) यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके यांची उपस्थिती होती तर परिषदेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले. ज्यात त्यांनी महाविद्यालयाची आतापर्यंत झालेली वाटचाल आणि विकास यासंबंधी विवेचन केले. प्रास्ताविका नंतर मान्यवरांच्या हस्ते परिषदेची स्मरणीका प्रकाशित करण्यात आली. आपल्या बिजभाषणात डॉ. मनोज कुमार जेना म्हणाले की, ग्रामीण भागाची जुनी ओळख संपुष्टात येऊन खेडी ही बनली आहेत. जागतिकरणाने सर्व समाज घटकांना एकत्रित जोडले पाहिजे. जगतिकी करणाने समाजात सकारात्मक बदल घडवून आणावेत अशी अपेक्षा आहे. हा विकास पर्यावरण व मानव यांना जोडणारा असावा. डॉ. संजय साळुंके म्हणाले की, जागतिकीकरणाने भांडवलशाही देशात आली आणि काही विशिष्ट अशा सामाजाकडे संपत्ती एकवटली आहे. संपत्तीचे विकेंद्रीकरण होऊन समाजाच्या सर्व घटकांना विकासची संधी मिळावी. या जागतिकीकरणाची संधी समाजातील सर्वच घटक चाखत आहेत. जागतिकीकरणाने ग्रामीण भागातील वैशिष्ट्येपूर्ण ओळखीला छेद देण्याचा प्रयत्न केला आहे. अध्यक्षीय समारोपात डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी असे प्रतिपादन केले की, जागतिकीकरणाने ग्रामीण समाज जीवनात जे बदल घडवून आणले आहेत ते पर्यावरण पुरक असावेत. जागतिकीकरणातून वसुधैव: कुंटुंबकम ही संकल्पना पुढे आली आहे. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. अश्विन रांजणीकर व लक्ष्मीकांत ढेपले यांनी केले. परिषद समन्वयक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी आभार मानले.

२) **पहिले सत्र - जागतिकीकरणाचा ग्रामीण स्थित्यंतरावर झालेला परिणाम (Impact of Globalization on Rural Transformation in India):-** उद्घाटन सत्रानंतर झालेल्या पहिल्या सत्रात परिषदेत सहभागी झालेल्या प्राध्यापक/संशोधक विद्यार्थी यांच्या शोध निबंधाचे वाचन झाले. सदरील सत्रास अध्यक्ष म्हणून डॉ. बालाजी केंद्र (समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ) हे लाभले होते. उपाध्यक्ष म्हणून डॉ. सुधीर येवले (कालीका देवी महाविद्यालय, शिरूर, बीड) हे होते तर अहवाल लेखक म्हणून प्रा. राज पोपळघट (राजर्षी शाहु महाविद्यालय, पार्थी) उपस्थित होते. सदरील सत्रात १२

जणांनी आपले शोधनिबंध सादर केले. सादर केलेल्या शोधनिबंधावर प्रश्नोत्तरे व चर्चा घडवून आली. सत्राच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. बालाजी केंद्रे यांनी सदरील सत्रात झालेल्या विषयाची चर्चा व विष्कर्ष मांडले. ते म्हणाले की, जागतिकीकरणाचा ग्रामीण स्थित्यंतरावर होणारे परिणाम सकारात्मक व नाकारात्मक दोन्ही बाजूने अभ्यासने गरजेचे आहे.

३) **दुसरे सत्र - ग्रामीण विकास कार्यक्रम (Rural Development Programme):-** भोजनानंतर झालेल्या दुसऱ्या सत्रात ग्रामीण विकास कार्यक्रम या विषयावर परिषदेत सहभागी झालेल्या प्राध्यापक/संशोधक विद्यार्थी यांच्या शोधनिबंधाचे वाचन झाले. सदरील सत्रास अध्यक्षस्थानी डॉ. हनुमंत मिसाळ (श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर) हे लाभले होते. उपाध्यक्ष म्हणून डॉ. कालीदास भांगे (श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगांव रंगारी) हे तर अहवाल लेखक म्हणून डॉ. देवराव दराडे (वसंतराव नाईक कॉलेज, औरंगाबाद) लाभले होते. सदरील सत्रात १० जणांनी आपले शोधनिबंध सादर केले. सादर केलेल्या शोधनिबंधावर प्रश्नोत्तरे व चर्चा घडून आली. सत्राच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. हनुमंत मिसाळ यांनी सदरील सत्रात झालेल्या विषयाची चर्चा व निष्कर्ष मांडले. ते म्हणाले की, शासन ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध शासकीय योजना राबवित आहे. या योजनांच्या यश-अपयशाचे मुल्यमापन होऊन त्यात सुधारणा अथवा बदल करणे गरजेचे आहे. दोन्ही सत्रात काही प्राध्यापकांनी PPT द्वारे आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले.

४) **समारोप समारंभ:-** राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सत्रास अध्यक्ष म्हणून श्री देवजीभाई पटेल (उपाध्यक्ष, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था) हे लाभले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. बालाजी केंद्रे (मुंबई विद्यापीठ) प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. दा. धो. काचोळे (अध्यक्ष, सोशन रिसर्च, फाऊंडेशन औरगाबाद) हे लाभले होते. समारोप प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. बाजी केंद्रे म्हणाले की, ग्रामीण विकासासाठी शासन विविध योजना व धोरणे राबवित आहे. मात्र असे असले तरी त्याचा लाभ समाजातील तळागाळातील लोकांना होत नाही. त्यासाठी या योजनांची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने होणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत ग्रामीण भागातील शेतकरी व करागिर टिकला पाहिजे. या परिवर्तनाच्या प्रक्रियेत त्याचाही विकास झाला पाहिजे. डॉ. दा. धो. काचोळे म्हणाले की, जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात जे विविध स्वरूपाचे बदल होत आहेत त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. परिषदे विषयी प्रतिक्रिया डॉ. सुधीर येवले व डॉ देवराव दराडे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या व ही परिषद यशस्वी झाली असे मत मांडले. या सत्रात उत्कृष्ट शोधनिबंधासाठी प्रा. रमेश नारायण ढवळे (कृषि महाविद्यालय, लातूर), प्रा. शेषराव राठोड (विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर) श्री बाबासाहेब छबुराव लहाने (श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री) यांना पुरस्कार देण्यात आले. अध्यक्षीय समारोपात श्री देवजीभाई पटेल यांनी असे मत व्यक्त केले की, ग्रामीण समाज जीवनाचे प्रश्न व समस्यांचा अभ्यास करून त्या सोडविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत. शिक्षकांवर समाजाची फार मोठी जबाबदारी आहे. समारोप सत्राचे सुत्रसंचलन डॉ. महेश थोरात यांनी केले. तर उपस्थित मान्यवर संशोधक यांचे आभार डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मानले. या राष्ट्रीय परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, डॉ. मंजुषा नळगीरकर (परिषद समन्वयक), प्रा. अनिल जाधव यांनी परिश्रम घेतले. या परिषदेस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.`

## विद्यार्थी समुपदेश व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा (दि. ३० व ३१ जानेवारी २०१८)

१) **उद्‌घाटन सत्र:-** उद्‌घाटक म्हणून डॉ. संजय मून (संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) हे होते. बीजभाषक म्हणून विद्यार्थी विकास

विभागाचे संचालक डॉ. मुस्तजीत अहमद खान हे होते तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत असताना डॉ. संजय मून म्हणाले की, देशाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातंर्गत हा विभाग काम करतो. शिक्षणातून मनुष्यबळ विकासाचे काम झाले पाहिजे. शिक्षणातून विकसीत झालेले व्यक्तीमत्व समाजाच्या विकासासाठी वापरात आले पाहिजे. बीजभाषक म्हणून डॉ. मुस्तजीत खान यांनी मुलाखत तंत्र या विषयावर मार्गदर्शन केले. प्रोजेक्टरच्या सहाय्याने विविध चित्रफितीच्या माध्यमातून त्यांनी हा विषय स्पष्ट केला. मुलाखत काराने जेवढे विचारले तेवढे सांगावे, अतिउत्साही होऊ नये, मुलाखत द्यावयाच्या ठिकाणाची आगोदर व्यवस्थित माहिती द्यावी इत्यादी विविध बारकावे त्यांनी सांगितले.

२) **दुसरे सत्र - संभाषण कौशल्य:-** डॉ. उत्तम अंभोरे (प्राध्यापक, इंग्रजी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातही संभाषण कौशल्याचे महत्त्व आहे. आपल्या बोलण्यावर व शब्दाबद्दल आत्मविश्वास असावा. शब्दावर पकड असावी. प्रत्येक व्यक्तीला किमान आपल्या मातृभाषेतून तरी चांगले संभाषण करता येणे गरजेचे आहे.

३) **तिसरे सत्र - लेखन कौशल्य:-** या विषयावर डॉ. अश्विन रांजणीकर यांनी मार्गदर्शन केले तर अध्यक्षीय समारोप डॉ. महेश थोरात यांनी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री लक्ष्मीकांत ढेपले यांनी केला.

४) **दि. ३१ जानेवारी २०१८ - सत्र चौथे:-** महिलांना पोलीस क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावर सौ. अर्चना पाटील (साहाय्यक पोलीस निरीक्षक, वडोदबाजार) यांनी आपले मत मांडतांना पोलीस दलातील सेवेबाबत विचार करताना सर्वात खालच्या पदावरील नौकरीचा विचार न करता थोड्या वरच्या पदावरील नौकरीचा विचार करावा. त्यांनी स्वत: या पोलीस सेवेत प्रवेश करताना कसा अभ्यास केला व शारीरिक चाचणीत यशस्वी होण्यासाठी घ्यावे लागलेले प्रशिक्षण याची माहिती दिली. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना फुलंब्री येथील पोलीस निरीक्षक श्री बापूसाहेब महाजन म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून तयारी करावी. अभ्यासाचे अधिक दडपन न घेता अभ्यास करावा. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. ज्योती उदये या स्वयंसेविकेने केले. प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश डॉ. पांडूरंग कलयाणकर यांनी सांगितला तर आभार डॉ. संदीप जगताप यांनी मानले.

५) **सत्र पाचवे - समाजकार्य विषयातील रोजगार संधी:-** या विषयात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलयानंतर विविध शासकीय क्षेत्रात उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधीची माहिती श्री मनोद गाढेकर (विभागीय प्रत्यारोपन समन्वयक, एम. जी. एम. औरंगाबाद) यांनी दिली. वर्तमान धावपळीच्या जीवनात समुपदेशकाचे महत्त्व स्पष्ट करून अवयवदान करून आपण अनेक जनांचे कसे प्राण वाचवू शकतो याची माहिती त्याने दिली. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी केला. सुत्रसंचलन कु. मंगल सुरभय्ये तर आभार डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मानले.

६) **सत्र सहावे - उद्योजकीय गुणांचा विकास:-** प्रा. अविनाश धोटो यांनी असे मत मांडले की, व्यक्तीने स्वत:च्या उद्योगाचे स्वप्न निर्माण करून ते प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करावा.

७) **सत्र सातवे - नौकरी संदर्भातील बायोडाटा:-** यावेळी प्रा. विजय पांडे यांनी आजच्या संगणकाच्या युगात बायोडाटा करणे किती सहज व सोपे झाले आहे ते सांगितले.

◆◆◆